संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा






मा.श्री.सचिन डफळ  ॲड.सौ.अनिता दिघे  मा.श्री.गजेंद्र राशीनकर  मा.श्री.सुमित वर्मा



प्रभाग क्र.९

नवरात्र, दसरा व दिपावलीनिमित्त
सर्व परिवारास हार्दिक शुभेच्छा..

प्रभाग क्र.९

दिपक दांगट (बडेभोले)

महाराष्ट्र नवनिर्माण सेना, अहिल्यानगर

डॉ. संतोष साळवे, इंजि.विनोद काकडे, अशोक दातरंगे, अनिकेत शियाळ, सौ. आरती उफाडे, किरण रोकडे,
संदीप चौधरी, संकेत व्यवहारे, मनोज राऊत, तुषार हिरवे, गणेश शिंदे, प्रशांत गायकवाड, महेश चव्हाण



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १० (६+४) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०१.१०.२०२५ | अंक नं. १५४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



दसऱ्याचा आनंद साजरा करा
सुवर्णखरेदीने, डबल फायद्याने..

डबल फायदा

सर्व दागिन्यांची
प्रतीग्रॅम मजुरी
₹ 888/-*

+

जेवढ्या वजनाचे सोने
तेवढ्या वजनाची चांदी
चक्क फ्री *



खास दसऱ्यानिमित्त सोन्याचे आपट्याचे पान,
वेढणी व क्वॉईन देखील उपलब्ध.

दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा !

Conditions Apply*

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..

शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02
बुधवार चालु

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES
Since 1965

Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite

सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

राम एजन्सी
48 वर्षांची विश्वासाची परंपरा !

विजयादशमी
निमित्त सर्व ग्राहकांना हार्दिक शुभेच्छा!

सॅमसंगसह सर्व कंपनीचे होम अप्लायन्सेस,
अद्ययावत मोबाईल फोन,
tablet, स्मार्टवॉच आणि बरंच काही...

GST बचत उत्सव...
स्मार्ट ग्राहकांची
स्मार्ट निवड...



भरघोस सूट | आकर्षक किंमत | फायनान्स सुविधा | सर्वोत्कृष्ट सेवा

SAMSUNG | V-GUARD | BLUE STAR | Whirlpool | KENSTAR | Mysore Fine | KENT | AKAI
USHA | BOSCH | BAJAJ | VOLTAS | MITSUBISHI ELECTRIC | Symphony | Panasonic | PHILIPS | Racold

प्रशस्त पार्किंग सुविधा | फ्री होम डिलेव्हरी | फ्री डेमोन्स्ट्रेशन | क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड

सावेडी 0241 - 2419141 | नवीपेठ 0241 - 2419142 | मार्केटयार्ड 0241 - 2419143 | No Cost EMI | HDFC | HDB | CREDIT/DEBIT CARD | SAME DAY DELIVERY & INSTALLATION

ALSO AVAILABLE IN ALL LEADING STORES OF AHILYANAGAR DISTRICT

Eye Q Media

MORESHWARA HEIGHTS

॥ विजयादशमी ॥
मुहुर्तावर सुखवास्तूची बुकींग करा

आनंदधाम जवळ,
भवानी नगर येथे
वास्तू शास्त्रानुसार साकार होत आहे.

3 BHK
LUXURIOUS FLATS
One Floor, One Flat



Your Luxurious
Heaven Awaits

Smart Living,
Smart Investment




GALAXY

PROJECT BY
Er. Charudatta Mulay
+91-78754 29889

Site : Plot No 9, Survey No. 26/3/1, Bhavani Nagar,
Near Anand Dhaam, Ahilyanagar.









# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





"झेप आपली अशीच उंच उंच जावो...
पुन्हा पुन्हा अभिष्टचिंतनाचा योग असाच येत राहो..."

आमचे परममित्र **रियाजभाई सय्यद**
(शिवसेना अल्पसंख्याक शहर प्रमुख)

आपणांस उदंड आयुष्याच्या **हार्दिक शुभेच्छा!**

शिवसेना

रियाजभाई सय्यद

* शुभेच्छुक
मा सभापती गणेश कवडे मित्र मंडळ
नाना पाटिल वस्ताद तालीम नालेगाव अ.नगर

मा.श्री.गणेशजी कवडे
मा.सभापती, मनपा, अहिल्यानगर



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १० (६+४) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०१.१०.२०२५ | अंक नं. १५४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



ना गिफ्टची लालच...
ना लकी ड्रॉची भुरळ!
फायदा हा
सर्व ग्राहकांचाच!

DATE - 01/10/2025
TIME - 12:56 PM

| | |
|---|---|
| १० \| ००० ग्राम | वजन |
| ₹.१,०८,८४० | २२ कॅरेट सोने दर |
| ६.९ % | मजुरी |
| ३ % | G.S.T. |
| ₹.१,१९ ,८४०/- | एकूण रक्कम |

प्रती ग्रॅम
₹.७५०/-
मजुरी

मे. शिंगवी ज्वेलर्स
- सोने, चांदी व रत्ने -
हत्ती चौक, सर्जेपुरा, अहिल्यानगर
९७८७५७७००१



॥ ११ वे पुण्यस्मरण ॥



मनी होता साधेपणा,
कधी न दाखवला मोठेपणा ।
प्रेम दिले तुम्ही जीवापाड आम्हास,
कधीही नाही विसरणार तुम्हांस
मिळो सदैव शांती तुमच्या आत्म्यास,
हीच प्रार्थना आमुची परमेश्वरास

आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली..

स्व. सुरेन्द्रकुमार गोपालदास गुजराथी
स्व. दि. २/१०/२०१४

* दुःखांकित *
गुजराथी परिवार
अहिल्यानगर


# जमिन विक्री व्यवहारात अहिल्यानगरमध्ये पोलिसाची फसवणूक, तिघांवर गुन्हा दाखल

नगर – महामार्गाच्या रुंदीकरणाच्या कामासाठी शासनाने संपादित केलेल्या जमिनीचा शासनाकडून मोबदला घेतला, परंतु केवळ या संपादित जमिनीचे महसूल विभागातून निघणारे कमी जास्त पत्रक न निघाल्याने ७ /१२ उताऱ्यावरून सदर क्षेत्र कमी न झाल्याचा गैरफायदा घेत सदर क्षेत्र विक्री करून जिल्हा पोलिस दलात सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत असलेल्या पोलिसाची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तिघांच्या विरुद्ध पारनेर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रभाकर भाऊसाहेब भांबरकर (वय ५५, रा. राणी लक्ष्मीबाई चौक, केडगाव, मूळ रा. भाळवणी ता. पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांना मुलांच्या व्यवसायासाठी कृषक व अकृषक शेतजमीन खरेदी करायची होती. त्यामुळे ते शोध घेत असताना त्यांना काही ओळखीच्या व्यक्तींकडून भाळवणी येथील लताबाई बाळासाहेब रोहकले यांची महामार्गालगत ११३.५ गुंठे शेतजमीन विक्री साठी असल्याचे समजले. त्यांनी भाळवणी येथे जावून रोहकले यांच्याशी चर्चा केली. त्यांचा व्यवहारही ठरला. त्यानुसार त्यांनी त्यांच्या व पत्नीच्या नावे १७ जानेवारी २०२५ रोजी पारनेर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात साठेखत व ८ मे २०२५ रोजी खरेदीखत करून जमीनीचा व्यवहार पूर्ण करत ठरलेली रक्कम रोहकले यांना दिली.

त्यानंतर सध्या नगर-कल्याण महामार्गाचे रुंदीकरणाचे काम सुरु असल्याने आपण खरेदी केलेल्या जमिनीचे काही क्षेत्र या साठी संपादित होणार आहे किंवा कसे याची त्यांनी चौकशी केली. प्रांताधिकारी कार्यालयात चौकशीसाठी गेल्यावर त्यांना समजले (पुढील मजकूर पान २ वर)


आता पाणी स्टोरेजची चिंता सोडा
अभय सेल्स घेऊन आले आहेत
100 ते 5000 लिटर पर्यंतच्या वॉटर टँक
3 लेयर, 6 लेयर, 8 लेयर



अधिकृत विक्रेते!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE



ज्योतिष संबंधी
जगातील पहिली वेबसाईट
ज्योतिषविषयक सर्व प्रश्नांची उत्तरं,
सोप्पे उपाय फक्त २०० रुपयात

पत्रिकेची गरज नाही प्रश्न निवडा-योग्य उत्तर,
प्रभावी उपाय मिळवा सुमारे १६ वर्षाचा अनुभव
वेबसाईट- Greatanswer.in



विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
दसरा - दिवाळी
03 04 05 06
ऑक्टोबर
दिवस आनंदाचे
4
दिवस दिवाळीपूर्व खरेदीचे
10%
ॲडिशनल डिस्काऊंट
ही योजना फक्त अहिल्यानगर व श्रीरामपूर शाखेकरिता..

| अ.नगर | संगमनेर | श्रीरामपूर | नारायणगाव |
|---|---|---|---|
| (0241) 2999299 | (02425) 222226 | (02422) 220090 | (02132) 242132 |



कर्तृत्व - नेतृत्व
आदरणीय व्यक्तिमत्व



अशोकभाऊ फिरोदिया
जन्म दि. २ ऑक्टोंबर १९४४ । स्व. दि. २२ ऑक्टोंबर २०००

८१ व्या जन्मजयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !

AES

सर्व विश्वस्त, सल्लागार मंडळ, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी
अहमदनगर एज्युकेशन सोसायटी
अहिल्यानगर



डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

* डोकेदुखी, मायग्रेन
* फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे
* व्हर्टिगो, चक्कर येणे
* अर्धांगवायू, पॅरेलीसीस
* विसराळूपणा
* थरथर सुटणे, पार्किन्सन

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध. * सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कास्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
9257575718
9764416136

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जमिन विक्री व्यवहारात अहिल्यानगरमध्ये पोलिसाची फसवणूक

(पान १ वरुन)

की त्यांच्या पत्नीच्या नावे खरेदी केलेल्या शेतजमिनी पैकी ७ गुंठे जमीन ही सन २०२२ मध्येच या महामार्गाच्या कामासाठी शासनाने संपादित केलेली असून त्याचा मोबदला म्हणून ८ लाख ३ हजार ७७९ रुपये एवढी रक्कम आरटीजीएस द्वारे शासनाने पूर्वीच्या जमीन मालक लताबाई बाळासाहेब रोहकले यांच्या बँक खात्यात ८ डिसेंबर २०२२ रोजी जमा करण्यात आलेली आहे.

या संपादित झालेल्या जमिनीचा मोबदला घेवून केवळ या संपादित जमिनीचे महसूल विभागातून निघणारे कमी जास्त पत्रक न निघाल्याने ७ /१२ उताऱ्यावरून सदर क्षेत्र कमी न झाल्याचा गैरफायदा घेत सदर क्षेत्र चालू बाजारभावाच्या किंमतीत खरेदीखताद्वारे आपणास विक्री करून आपली तसेच भारतीय नोंदणी कायदा १९०८ चे कलम ८२ चे उल्लंघन करून शासनाची जमीन मालक लताबाई बाळासाहेब रोहकले, त्यांचे पती बाळासाहेब रामदास रोहकले व मुलगा विजय बाळासाहेब रोहकले (सर्व रा. भाळवणी ता. पारनेर) यांनी फसवणूक केली आहे. या तिघांवर या पूर्वी ही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून त्यांच्या पासून आपणास व आपल्या कुटुंबाच्या जीवितास धोका असल्याचे प्रभाकर भांबरकर यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी तिघांच्या विरुद्ध नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२, बीएनएस कलम ३(५), ३१६ (२), ३१८ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ हे करत आहेत.

# महिला व बालविकास भवन उभारणीत येत असलेल्या त्रुटींची अहिल्यानगर महानगरपालिकेने तातडीने सोडवणूक करावी

## विभागाच्या विविध योजनांचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी घेतला आढावा

नगर - कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. कायद्यांतर्गत पीडित महिलांना तक्रार कुठे करावी याची अनेकदा माहिती नसते. महिलांना तक्रार करणे सुलभ व्हावे, यासाठी संबंधित तालुका व जिल्हा संरक्षण अधिकाऱ्यांचे नाव व संपर्क क्रमांक ग्रामपंचायत, पोलीस स्टेशन, अंगणवाडी व नागरिकांची वर्दळ असलेल्या सर्व कार्यालयांच्या दर्शनी भागात लावावेत. महिला हेल्पलाईन क्र. १८१ व बालकांसाठी १०९८ बाबत व्यापक जनजागृती करावी. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंध व निवारण कायद्यांतर्गत सर्व कार्यालयात अंतर्गत समित्या स्थापन होतील, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या. बेटी बचाओ बेटी पढ़ाओ ही योजना मुलगी वाचवा आणि तिचे शिक्षण करून समाज सक्षम करा असा संदेश देणारी योजना असून या योजनेची व्यापक जनजागृती करण्यात यावी. जिल्ह्यात वेठबिगार मुलांची शोधमोहिम अधिक व्यापक करण्यात यावी. महिला बालविकास भवन उभारणीमध्ये येत असलेल्या त्रुटींची महानगरपालिकेने तातडीने सोडवणूक करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या.



महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत घेतला.

महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत घेतला. बैठकीस जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव कृष्णा एम. सोनवणे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एस. जी. कदम, पोलीस उपअधीक्षक जगदीश भांडाळ, बालकल्याण विकास अधिकारी नारायण कराळे, डॉ. सोनाली बांगर, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकुमार नेहरकर, परिविक्षा अधिकारी योगिराज जाधव यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हास्तरीय नियंत्रण समिती, जिल्हा परिविक्षा समिती, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा पुरविणारी समिती, जिल्हा बाल संरक्षण समिती, जिल्हा पुनर्वसन समिती, बालकल्याण समिती, जिल्हास्तरीय प्रायोजकत्व व प्रतिपालकत्व मंजुरी समिती तसेच जिल्हा कृतीदल समितीच्या कामकाजाचाही आढावा घेतला.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एस. जी. कदम यांनी विभागामार्फत करण्यात आलेल्या कामकाजाची माहिती पॉवरपॉइंटच्या माध्यमातून सादर केली.

बैठकीस संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# इंस्टाग्रामवर बदनामी, जीवे मारण्याची धमकी

## दोघांविरूध्द गुन्हा दाखल, केडगावच्या एकावर पोलिसांची कारवाई

नगर - धार्मिक कार्यक्रमात रांगोळी रेखाटल्यानंतर मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखविल्याच्या आरोपावरून अटकेत असलेला संग्राम आसाराम रासकर (रा. बारातोटी कारंजा, माळीवाडा) याची सोशल मीडियाच्या माध्यमातून बदनामी करत जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संग्रामचा चुलतभाऊ अनिकेत बाबासाहेब रासकर (वय २३, रा. बारातोटी कारंजा, माळीवाडा) यांनी ३० सप्टेंबर रोजी फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनिकेत रासकर यांचे चुलतभाऊ संग्राम रासकर यांचे फोटो इंस्टाग्राम अकाउंटधारकांनी संपादित करून त्यावर स्टीकर लावले. तसेच इंग्रजीत अश्लिल व अशोभनीय मजकूर लिहून त्यांची बदनामी केली. याचबरोबर फिर्यादीच्या नातेवाईकाला जिवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी अबूसलेमन इम्रान सय्यद याच्यासह आणखी एका इंस्टाग्राम अकाउंटधारक इसम विरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणात समीर राजु सय्यद (वय २३, रा. केडगाव वेशी जवळ, अहिल्यानगर) याच्यावर पोलिसांनी बीएनएस कलम १७० (१) प्रमाणे कारवाई केली आहे. दरम्यान शहरात दोन समाजाच्या गटांमध्ये तणावपूर्ण परिस्थिती असताना सोशल मीडियाच्या माध्यमातून धार्मिक भावना भडकविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# ५ गुंतवणूकदारांची ३३ लाखांची फसवणूक, संचालक मंडळ, एजंटांसह १६ जणांच्या विरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल

नगर - 'सिस्पे कंपनी',ट्रेडज इन्व्हेस्टमेंट प्रा.लि. या कथित फायनान्स कंपन्यांनी पारनेर तालुक्यातील २१ हजार ३६१ गुंतवणूकदारांची तब्बल ४५० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्या प्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात १ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल झालेला असताना आणखी ५ गुंतवणूकदारांची ३३ लाखांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे संचालक मंडळ, एजंटांसह १६ जणांच्या विरुद्ध आणखी एक गुन्हा सुपा पोलिस ठाण्यात ३० सप्टेंबर रोजी दाखल झाला आहे.

याबाबत धीरज सुनिल कुलट (वय २५, रा. खातगाव टाकळी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून नवनाथ जगन्नाथ अवताडे (रा.पंढरपूर, सोलापूर), सुवर्णा नवनाथ अवताडे (रा.पंढरपूर, सोलापूर), शुभम नवनाथ अवताडे (रा.पंढरपूर, सोलापूर), कंपनीचा सीईओ अगस्ती मिश्रा, ययाती मिश्रा, राहुल सुखदेव काळोखे, विनोद बबन गाडीलकर (रा.वाघुंडे, ता.पारनेर), विक्रम बबन गाडीलकर (रा.वाघुंडे, ता.पारनेर), बबन मुरलीधर गवळी (रा.शहांजापूर, ता.पारनेर), विराज बबन गवळी (रा.शहांजापूर, ता.पारनेर), गणेश महातेकर (रा. अहिल्यानगर), हेमंत चव्हाण, अंकुश सापते, संदीप संपतराव दरेकर (रा.हिरडगाव, ता. श्रीगोंदा), प्रसाद बाजीराव देशमुख, पांडुरंग किसन खामकर यांच्याविरूध्द बीएनएस कलम ३१६ (२), ३१६ (४), ३१६ (५), ३१८ (४), ३ (५) सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३, ४, माहिती तंत्रज्ञात अधिनियम २००० चे कलम ६६ (ड), बेकायदेशीर ठेव योजना अधिनियम २०१९ चे कलम ३, ५, २३ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी धीरज कुलट व सुपा व परिसरातील ५ गुंतवणुकदारांचे प्रथम सिस्पे नंतर ट्रेडज इन्व्हेस्टमेंट, इन्फीनाईट बिकन मल्टीस्टेट या नावाच्या कंपन्या सुरु करून शेअर्समध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली व १० ते १२ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून कोट्यावधी रूपये जमा केले. या कंपनीकडूनही गुंतवणुकदारांचे काही दिवसांपासून पैसे परत मिळेनासे झाले आहेत. कंपनीचे काम सुरू आहे. कंपनीचे नाव बदलले आहे. परकीय चलनात आपले शेअर्स बदलले जात आहेत, सॉफ्टवेअर दुरूस्ती सुरू आहे, अशी कारणे सांगत गुंतवणुकदारांना काही दिवस झुलवत ठेवले होते. मात्र नंतर काही दिवसांपूर्वी कंपनीचे कार्यालय बंद झाल्याने आता पैसे मिळणार नाहीत, अशी खात्री गुंतवणुकदारांची झाली.

त्यांनी एजंटांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र एजंटांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यावर फिर्यादी सह अन्य गुंतवणूकदारांनी जिल्हा न्यायालयात तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल घेत न्यायालयाने याबाबत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्या नंतर हा आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा तपास पो.नि. ज्योती गडकरी या करत आहेत. या कंपनीवर काही दिवसांपूर्वी श्रीगोंदा आणि नगर शहरातील तोफखाना पोलिस ठाण्यातही गुन्हे दाखल झालेले आहेत.

# शनिशिंगणापूर देवस्थानसाठी कार्यकारी समिती स्थापन

नगर - शनिशिंगणापूर देवस्थानचे विश्वस्थ मंडळ बरखास्त करून राज्य सरकारने प्रशासक म्हणून जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची नियुक्ती केली आहे. आता जिल्हाधिकारी यांनी ट्रस्टचे कामकाज पाहण्यासाठी कार्यकारी समिती स्थापन केली आहे. समितीमध्ये फक्त सरकारी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. ११ अधिकाऱ्यांची ही समिती आहे.


या समितीत मुख्य कार्यकारी अधिकारीपदी अतुल चोरमारे (उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.१), उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय बिरादार (तहसिलदार, नेवासा), मुख्य लेखाधिकारी तथा सदस्य गणेश खेडकर (लेखाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर), उप मुख्य लेखाधिकारी तथा सदस्य राजकुमार पुंड (उपकोषागार अधिकारी, नेवासा), व्यवस्थापक तथा सदस्य सचिव राजेंद्र वाकचौरे (नायब तहसीलदार, नेवासा), उप व्यवस्थापक तथा सदस्य विनायक गोरे (मंडळाधिकारी, घोडेगाव), सदस्य - संजय लखवाल (गट विकास अधिकारी नेवासा), आशिष शेळके (सहायक पोलीस निरीक्षक, शनी शिंगणापूर पोलीस स्टेशन), विनायक पाटील (उपअभियंता सा.बां. नेवासा), सतिष पवार (तलाठी, शिंगणापूर), दादासाहेब बोरुडे (ग्रामसेवक, शिंगणापूर) यांचा समावेश आहे.

# धार्मिक तेढ नव्हे, सलोखा हवा; राजकीय स्वार्थासाठी द्वेषाचे राजकारण करू नये, अहिल्यानगर शहराला कोण वेठीस धरत आहे? प्रशासनाने कठोर कारवाई करावी

## शहराचे वैभव धार्मिक तेढीमुळे धोक्यात : राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष हाजी शौकत तांबोळी

नगर - संतांचा वारसा आणि धार्मिक सलोख्यामुळे प्रसिद्ध असलेले अहिल्यानगर शहर आज धार्मिक तेढीमुळे बदनाम होत चालले आहे. शहराचे हे वैभव नष्ट होऊ नये यासाठी सर्व समाजांनी आत्मपरीक्षण करून एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष हाजी शौकत तांबोळी यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

बारातोटी कारंजा चौकातील रांगोळी प्रकरण, कोठला येथे झालेले रस्ता रोको आंदोलन आणि त्यानंतरच्या लाठीचार्ज घटनेचा उल्लेख करताना त्यांनी तीव्र निषेध नोंदविला. या अशोभनीय घटनांमुळे व्यापारी, सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. कित्येक वर्ष शांततेचे प्रतीक असलेले शहर अचानक हिंदू-मुस्लिम भांडणामुळे चर्चेत आले, ही बाब दुर्दैवी आहे, असे ते म्हणाले.



तांबोळी यांनी पुढे सांगितले की, अहिल्यानगर शहरात प्रायोजित स्वरूपाच्या घटना घडवून धार्मिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न होत आहे. यामागे कोणती अदृश्य शक्ती कार्यरत आहे याचा शोध घेऊन प्रशासनाने कठोर कारवाई करावी. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही माजी व भावी लोकप्रतिनिधी आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी समाजात तेढ निर्माण करत आहेत. सोशल मीडिया व फेक आयडीच्या माध्यमातून भडकावले जात आहे. अशा घटनांवर तातडीने आळा घालणे आवश्यक आहे. आणि धार्मिक भावना भडकविणाऱ्या गुन्ह्यांवर किरकोळ कलमे लावून जामिनावर सोडण्याच्या घटनांमुळे जनतेत नाराजी आहे. वेळोवेळी दिलेल्या निवेदनांची दखल घेतली गेली नाही. जर वेळेत कारवाई झाली असती तर आज ही परिस्थिती उद्भवली नसती, असे त्यांनी स्पष्ट केले.

शहरातील शांतता परत आणण्यासाठी मुस्लिम समाज पुढाकार घेत असल्याचे सांगून तांबोळी म्हणाले की, अहिल्यानगर शहरातील सुज्ञ नागरिकांनी समाजहितासाठी एकत्र यावे. शांतता, सलोखा व एकात्मता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी आम्ही पुढाकार घेण्यास तयार आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्राचे सचिव आमदार रोहित पवार व वरिष्ठ नेते लवकरच विविध समाज बांधवांना एकत्र करून सलोखा वाढविण्याचे प्रयत्न करणार आहेत, अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये हाजी शौकत तांबोळी यांनी दिली.

## विठ्ठलराव गारुडकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - जाधववाडी अकोळनेर येथील गारुडकर मळा येथील विठ्ठलराव अनंतराव गारुडकर (वय ९०) १ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर जाधववाडी (अकोळनेर, ता.नगर) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातु असा परिवार आहे. गोरख गारुडकर यांचे ते वडील तर शरद गारुडकर यांचे आजोबा होत.

## संजय परदेशी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - आगरकर मळ्यातील रहिवासी संजय मोहनसिंग परदेशी (वय ५८) यांचे १ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, मुलगी, २ भाऊ, भावजया, पुतणे असा परिवार आहे. निवृत्त सेल्स टॅक्स ऑफीसर शामभाऊ मोहनसिंग परदेशी यांचे ते धाकटे बंधू होत.

## विशाल गुंजाळ यांचे हृदयविकाराने निधन




नगर - नालेगाव परिसरातील वारुळाचा मारुती येथील रहिवासी विशाल अर्जुन गुंजाळ (वय ४५) यांचे १ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, १ बहीण असा परिवार आहे.

# अहिल्यानगरकर सुज्ञ आहेत, दहशत, दबावापुढे बोलायला मर्यादा असल्या तरी ते मूर्ख नाहीत

## तथाकथित कार्यसम्राटांनी रचलेल्या सापळ्याला बळी न पडता विकास, रोजगार, शांतता, सलोखा याला तरुणांनी प्राधान्य द्यावे : किरण काळे



नगर - महानगरपालिकेत सर्वसामान्यांच एक काम मार्गी लागत नाही. शहराची बाजारपेठ आणि रोजगार निर्मितीचा कणा असणारा ग्राहक हा ग्रामीण भागातील शेतकरी राजा आहे. पुरामुळे तो उध्वस्त झाला आहे. त्याला आपलं राजकीय वजन वापरून मदत मिळवून का देत नाही ? असा सवाल ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी सत्ताधाऱ्यांना केला आहे.

अहिल्यानगर मध्ये सोमवारी घडलेल्या धार्मिक तणावपूर्ण परिस्थितीवर काळे यांनी म्हटल आहे, अहिल्यानगरकर सुज्ञ आहेत. दहशत, दबावा पुढे बोलायला त्यांना मर्यादा असल्या तरी ते मूर्ख नाहीत. तमाम नगरकरांना, विशेषत: तरुणाईला माझ आवाहन आहे, आपल्या भवितव्याचा विचार करा. चिथावणीखोर, भडकाऊ वक्तव्यांना बळी पडू नका. करिअरकडे लक्ष केंद्रित करा.

### ते हिंदू धर्मरक्षक नसून भक्षक आहेत

आपल्या आकाच्या सांगण्यावरून कोणी जाणीवपूर्वक खोडसाळपणा करत असेल, त्या आडून कोणी स्वतःला हिंदू धर्मरक्षक म्हणून मिरवू पाहत असेल तर तो हिंदूंचा रक्षक नसून भक्षक आहे, हे समजण्या इतपत नगरकर सुज्ञ आहेत. शहरातील प्रत्येक नागरिकाचा राजयोग नाही. ते काही राजासाब नाहीत. कुणाचे अनितीचे दारूचे धंदे नाहीत. लॉजचा धंदा करण्या इतके सगळेच लकी नाहीत. प्रत्येक सर्वसामान्याचा अरुणोदय होईल असेही नाही. पहाटे चार पर्यंत काहींचे परमिट रूम जसे शहरात चालू असतात तशी व्यापाऱ्यांची दुकानं, हातावर पोट भरणाऱ्यांच्या हातगाड्या कोणी चालू ठेवू देणार नाही. शहराच्या आकांचे मस्तवाल बोके जसे अवैध धंद्याच्या माध्यमातून रोज कोट्यावधींची माया अनैतिक मार्गाने गोळा करतात तसे सर्वसामान्यांचे नाही. एकूणच काय तर दहशत, गुंडगिरी, अनैतिक मार्गाने जमा केलेली प्रचंड माया यामुळे तथाकथित कार्यसम्राटांचे पोट भरलेले आहे. लोक कष्ट करून प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न करत आहेत. दंगल सदृश परिस्थिती निर्माण करून आका मात्र लोकशाही, पोलीस प्रशासनाला हतबल करत आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही. हे सर्व थांबवायला हवे.

### नेत्यांची मुलं एसीत, गोरगरिबांची जेलमध्ये

पोलीस कारवाई नंतरच्या परिस्थितीवर भाष्य करताना किरण काळे म्हणाले की, दोन्ही समाजाच्या ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले त्यात कोणत्याही आमदार, खासदार, मंत्री, नगरसेवक, राजकीय नेते, पदाधिकारी यांची मुलं नाहीत. नेत्यांची मुलं एसीत आहेत. मात्र गोरगरिब, सर्वसामान्यांची जेलमध्ये गेली आहेत. मी खोट्या गुन्ह्यात तुरुंगवास भोगला आहे. तुरुंग म्हणजे नरक आहे. ढोंगी राजकीय पुढार्यांनी तरुणाईला या नरकात ढकलल आहे. ते आपली राजकीय पोळी भाजत आहेत. तुरुंगात गेलेल्या तरुणांच्या कुटुंबियांच्या घरात स्मशान शांतता आहे. यातून समाजाने शहाणे व्हावे, असे आवाहन काळे यांनी केले आहे.

### ते मूठभर लोक म्हणजे संपूर्ण समाज नाही

किरण काळे म्हणाले, दोन्ही समाजातील मूठभर लोकांना हाताशी धरून दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण केली जात आहे. हे मूठभर लोक म्हणजे संपूर्ण समाज, अहिल्यानगर नाही. कोणताही धर्म दुसऱ्याच्या धार्मिक भावना दुखावण्याची शिकवण देत नाही. मात्र काहींना बेगडी अजेंडा राबवत मंत्री होण्याची स्वप्न पडत आहेत. त्यांच्या विकृत, वैयक्तिक राजकीय राक्षसी महत्वकांक्षांशी सामान्य नगरकरांना काहीही देण - घेण नाही. जनतेला विकास हवा आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू केलेली तथाकथित दीडशे कोटी रुपयांची कामं सध्या पूर्णत: ठप्प झाली आहेत. बाजारपेठेसह उपनगरातील रस्त्यांची चाळण झाली आहे. या रखडलेल्या कामांमुळे सर्वत्र वाहतूक कोंडीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. निकृष्ट कामांमुळे रस्ते पावसात वाहून गेले आहेत.

### गल्ली ते दिल्ली तुम्हीच, तरी हिंदू खतरे मे ?

मनपा प्रशासक तथा आयुक्त तुमचेच. राज्यातील महायुती सरकार तुमचच. देशातील रंगा - बिल्लाच तथाकथित हिंदुत्ववादी सरकार ही तुमचंच. शहर लोकप्रतिनिधी देखील सत्ताधारी पक्षाचाच. गल्ली ते दिल्ली तथाकथित हिंदुत्ववादी सत्तेत असताना देखील अहिल्यानगर मधील तमाम हिंदू मात्र खतरे मे कसे काय असू शकतात ? खरंतर हिंदू खतरे मे नसून लोकप्रतिनिधी खतरे मे आहेत. म्हणून त्यांचा आटापिटा सुरू असल्याचा आरोप किरण काळे यांनी केला आहे. तथाकथित कार्यसम्राटांनी रचलेल्या या सापळ्याला बळी न पडता विकास, रोजगार, शांतता, सलोखा यांना प्राधान्य द्यावे असे आवाहन काळे यांनी ठाकरे शिवसेनेच्या वतीने नगरकरांना केले आहे. समाजकंटक, मग तो कोणत्याही धर्माचा असो, त्याच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे, असे किरण काळे यांनी म्हटले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



आदर्श बौद्ध कुटुंब २०२५ चा धम्मभूषण पुरस्कार शहरातील रवींद्र कांबळे व सुमन कांबळे यांना राष्ट्रीय प्रवचनकार प्रा. दि. वा. बागुल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# आदर्श बौद्ध कुटुंब चा धम्मभूषण पुरस्कार रवींद्र कांबळे व सुमन कांबळे यांना प्रदान

नगर – आदर्श बौद्ध कुटुंब २०२५ चा धम्मभूषण पुरस्कार शहरातील रवींद्र कांबळे व सुमन कांबळे यांना राष्ट्रीय प्रवचनकार प्रा. दि. वा. बागुल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सुरेश बनसोडे, अशोकराव गायकवाड, प्रा. माणिक विधाते, सुमेध गायकवाड, विलास साठे सर, अजय साळवे, किरण दाभाडे, विजय भांबळ, संजय जगताप, विशाल कांबळे, प्रा. भिमराव पगारे, विजय गव्हाळे, दत्ता खैरे, कौशल गायकवाड, सिद्धार्थ आढाव, गौतमीताई भिंगारदिवे, रवींद्र कांबळे, अंकुश मोहिते, विशाल भिंगारदिवे, समीर भिंगारदिवे, ऋषि विधाटे, सृजन भिंगारदिवे, जय दाभाडे, सुरेश भिंगारदिवे, वैभव ढाकणे, अनिकेत चव्हाण आदी उपस्थित होते.

रवींद्र कांबळे हे मागील ३० वर्षांपासून अखंड धम्मकार्य सुरू असुन भारतीय बौद्ध महासंघात त्यांनी विविध पदांवर कार्य केलेले आहे सम्यक संकल्प फाउंडेशन व क्रांतीसुर्य प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष असून पंचशील विद्या मंदिराचे विश्वस्त म्हणून ते कार्यरत आहे. त्यांनी विवाह सूचक मंडळ चालवून २५० पेक्षा अधिक विवाह लावले व वैद्यकीय तपासणी शिबिरे, धम्म परिषदा व सामाजिक उपक्रमांचे आयोजन तसेच समाजातील तळागाळापर्यंत कार्य पोहोचवून अनेक कुटुंबांना आधार दिला.

कांबळे दाम्पत्यांनी समाजासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना धम्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# आनंदनगर परिसरात भोंडल्याचा पारंपरिक उत्सव, आदिशक्ती मंडळाचा पुढाकार; महिला शक्तीचा जागर

नगर – नवरात्रोत्सवानिमित्त शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील आनंदनगर परिसरात आदिशक्ती महिला मंडळाच्या वतीने भोंडलाचा पारंपरिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाराष्ट्रातील पारंपारिक संस्कृतीची ओळख जपण्यासाठी आणि महिलांमध्ये एकोपा वाढवण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात देवीच्या आरतीने करण्यात आली. नटून–थटून पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपरिक गाणी, नृत्य, विनोदी खेळ, तसेच संवादाच्या माध्यमातून भोंडल्याला रंगत आणली. या प्रसंगी महिलांनी देवीची आराधना करून नवरात्रीचे महत्त्व अधोरेखित केले.



आदिशक्ती मंडळाच्या पुढाकाराने शहरातील आनंदनगर परिसरात भोंडल्याचा पारंपरिक उत्सव रंगला.

## महाराष्ट्रातील सांस्कृतिक परंपरा जतन करण्याचा प्रयत्न

भोंडला हा महाराष्ट्रातील एक जुना व पारंपारिक सण असून, यामध्ये महिलांना एकत्र येऊन आपली मते मांडण्याची, संस्कृतीचे जतन करण्याची आणि समाजात आपली भूमिका अधोरेखित करण्याची संधी मिळते. आदिशक्ती महिला मंडळाने हा कार्यक्रम आयोजित करून परिसरातील महिलांना एकत्र आणले.

या कार्यक्रमात मंगल पवार, मोनिका लालबागे, धनश्री गुजर, स्मिता कटारिया, कमल लालबागे, प्रिया लालबागे, नेहा लालबागे, पूजा चौधरी, मोहिनी शिंदे, रवीशा इथापे, सुनीता मुनोत, लता मुथा, प्राजक्ता नगरकर, लता बोरुडे, सुनिता हुलावळे, रेखा सस्तारे, विजया म्हस्के, राधा भगत, सविता लोखंडे, उमा क्षीरसागर, संगिता कावरे, रचना पवार, गीता भागानगरे, उर्मिला गुजर आदींसह परिसरातील महिलांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला.

मोनिका लालबागे म्हणाल्या की, आपली संस्कृती, आपली परंपरा आणि आपले सण हे केवळ आनंदाचे क्षण नसून समाजाला एकत्र आणण्याचे, विचारांची देवाणघेवाण करण्याचे साधन आहेत. भोंडला हा कार्यक्रम महिलांना स्वतःला व्यक्त करण्याची, आपले विचार मांडण्याची एक संधी मिळते. आजच्या धावपळीच्या युगात आपले पारंपरिक सण आणि परंपरा जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मंगल पवार म्हणाल्या की, आपली संस्कृती हाच आपला वारसा आहे. महिला जर एकत्र आल्या तर कोणतेही कार्य अशक्य राहणार नाही. महिला समाजातील कणा असून, त्यांच्या विचारातून संस्कृती टिकून आहे. नव्या पिढीला परंपरेची ओळख करून देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# देवी उपासनेतून धैर्य, संयम आणि शक्तीची प्रेरणा मिळते

### माणिक चौधरी यांचे प्रतिपादन

नगर – नवरात्र हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो श्रद्धा, एकोपा आणि संस्कृतीचा उत्सव आहे. आपल्या परंपरेनुसार देवी उपासनेतून आपण धैर्य, संयम आणि शक्तीची प्रेरणा घेतो. समाजातील प्रत्येकाने या उत्सवातून नवा उत्साह, सकारात्मक विचार आणि महिलांबद्दल आदर बाळगण्याची शिकवण घ्यावी, असे माणिक चौधरी म्हणाले.

एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सव उत्साहात साजरा होत आहे. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने मंदिर परिसरात भाविकांची गर्दी होत असून, शहरासह पंचक्रोशीतील भाविक देवीच्या दर्शनासाठी येत आहेत.



शहरातील आनंदनगर परिसरात रंगला भोंडल्याचा पारंपरिक उत्सव रंगला.

## श्री रेणुका माता देवस्थानात आरती

नवरात्राच्या पार्श्वभूमीवर एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी सपत्निक श्री रेणुका माता देवीची आरती करून दर्शन घेतले. या वेळी भाविक उपस्थित होते.

दररोज देवीच्या आरती, कीर्तन, गोंधळ, आदी धार्मिक कार्यक्रमांचे मंदिरात आयोजन करण्यात आले आहे. मंदीरात सजवलेल्या देवीचे आकर्षक मुर्ती, दिव्यांच्या रोषणाईत नटलेले मंडप आणि भक्तिरसपूर्ण वातावरण भाविकांचा उत्साह संचारला आहे. नवरात्रोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, तसेच विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर आदी पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये नव दुर्गा पूजन उत्साहात



नगर – नगरच्या इमारत कंपनी येथील लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये नवरात्री निमित्त नव दुर्गांचे पूजन करण्यात आले. मुलांनी प्रभू श्रीराम सीता लक्ष्मण यांची वेशभूषा परिधान केली होती. प्रभू श्रीराम यांनी विजयादशमीला रावणाचा वध करून दुष्प्रवृत्तींचा नायनाट केला होता. सर्व मुलांना नवरात्र तसेच विजयादशमीचे महत्व समजून सांगण्यात आले.

प्राचार्या मनिषा बोगावत व संचालक विशाल बोगावत यांच्या मार्गदर्शनाखाली हा नवरात्र विशेष कार्यक्रम झाला. यात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत नवरात्र उत्सवाची माहिती घेत त्याचे महत्व जाणून घेतले. नवरात्रीत स्त्री शक्तीचे पूजन करून कृतज्ञता व्यक्त करण्यात येते. दुष्टांचा संहार करून भक्तांना निर्भय करणाऱ्या देवी मातेचे विविध रूपे आहेत. त्यामुळे प्री स्कूलमध्ये नव दुर्गांचे विधीवत पूजन करण्यात आले. दुर्गेच्या रूपातील विद्याथीनींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अतिशय प्रसन्न वातावरणात ही पूजा झाली. यावेळी रामायण व रावण वधाची माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली. विजयादशमीच्या रावण दहनाच्या परंपरेची माहिती मुलांना देण्यात आली.

लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये क्रमिक शिक्षणाबरोबरच मुलांना भारतीय संस्कृती, सण, उत्सव, पूर्वापार चालत आलेल्या परंपरांची माहिती देण्यात येते. भावी पिढी हीच आपल्या संस्कृतीला पुढे नेणारी आहे. त्यादृष्टिने लहान वयातच त्यांच्यावर धार्मिकतेचे, नीतिमूल्यांचे संस्कार करण्यात येतात. पालक वर्गाने या उपक्रमाचे कौतुक करून शाळेचे आभार मानले.



रक्तदान शिबिरात युवकांनी सहभाग नोंदविला. याप्रसंगी बबलू सूर्यवंशी, नगरसेवक सुनील त्र्यंबके, बाळासाहेब पवार, विनीत पाऊलबुधे, दत्ता तापकिरे, विशाल सूर्यवंशी, राजू गाडे कार्यकर्ते आदी (छाया – विजय मते)

# रक्तदान ही समाजाला समर्पित सेवा असते

### सुर्य प्रतिष्ठानचे बबलू सूर्यवंशी यांचे प्रतिपादन

नगर – रक्तदान हे जीवनदान आहे त्यामुळे गरजू रुग्णांचे प्राण वाचतात. समाजात यंत्राद्वारे सर्व काही उपलब्ध करता येऊ शकते परंतु रक्त हे केवळ शरीरात तयार करण्याची प्रक्रिया आहे, रक्तदान केल्याने ते अधिक वाढते. रक्तदान करणे हे एक अनमोल दान आहे. यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळतात. शिवाय रक्तदात्याला पुण्य मिळते. रक्तदान समाजाला समर्पित असलेली एक सेवा आहे. असे प्रतिपादन सुर्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बबलु सूर्यवंशी यांनी केले आहे.

गजराजनगर येथे प्रतिष्ठानच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष बबलू सूर्यवंशी, नगरसेवक सुनील त्र्यंबके, बाळासाहेब पवार विनीत पाऊलबुधे, स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ता तापकिरे, ग्रामपंचायत सदस्य विशाल सूर्यवंशी, राजू गाडे, सागर मेट्टू पैलवान, प्रताप गायकवाड, लखन चखाले, सतीश कर्डिले आदि उपस्थित होते.

प्रारंभी स्व.सचिन गाडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. साई सेवा ब्लड सेंटर आयोजित या शिबिरास तरुणांनी सहभागी होऊन रक्तदान केले. सायंकाळपर्यंत ४२ बॅक रक्तदान झाल्याचे डॉक्टर अजित जगताप यांनी सांगितले. यावेळी बालघर प्रकल्पातील अनाथ मुलांना भोजन देण्यात आले.

या उपक्रमाचे संचालक युवराज गुंड यांनी कौतुक केली.

# केडगाव देवी मंदिर परिसरात भाविकांना फराळ वाटप

## मंदिर परिसरात स्वच्छता अभियान, नवरात्रोत्सवानिमित्त हरदिन मॉर्निंग ग्रुपचा उपक्रम

नगर – शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने केडगाव येथील श्री रेणुका माता मंदिर परिसरात फराळ वाटप करण्यात आले. तर मंदिराचे पावित्र्य राखत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

देवीच्या दर्शनाला आलेल्या भाविकांना खिचडी, चिवडा व केळीचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर मंदिर परिसरात ग्रुप सदस्यांनी स्वच्छता करून मंदिर परिसराची स्वच्छता केली.



शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने केडगाव येथील श्री रेणुका माता मंदिर परिसरात फराळ वाटप करण्यात आले.

या उपक्रमात ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, रमेश वराडे, जहीर सय्यद, सचिन चोपडा, सर्वेश सपकाळ, राजेंद्र चंगेडिया, मेजर दिलीपराव ठोकळ, अभिजीत सपकाळ, मनोहर दरवडे, दीपकराव धाडगे, सुधीर कपाळे, सरदारसिंग परदेशी, अविनाश जाधव, रतन मेहेत्रे, विलासराव आहेर, दीपकराव घोडके, अशोकराव पराते, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, सुंदरराव पाटील, अविनाश काळे, अविनाश पोतदार, दिलीप गुगळे, सुभाष पेंढुरकर, विठ्ठल (नाना) राहिंज, अनिलराव सोळसे, दशरथ मुंडे, योगेश चौधरी, सखाराम अळकुटे, जालिंदर अळकुटे, नवनाथ वेताळ, सार्थक साठे, जयराज अवचर, सुहास देवराईकर, दत्तात्रेय लाहुंडे, संजय भिंगारदिवे, रवींद्र जाजू, श्रीरंग देवकुळे, रामनाथ गर्जे, शेषराव पालवे, प्रकाश देवळालीकर, विनोद खोत, कुमार धतुरे, राजू शेख, दिनेश शहापूरकर, नीता देवराईकर, राजश्री राहिंज, प्रांजली सपकाळ आदी सदस्य सहभागी झाले होते.

संजय सपकाळ म्हणाले की, नवरात्र हा भक्तिभाव, शक्तीपूजा आणि समाजकार्याचा संदेश देणारा उत्सव आहे. देवीची उपासना करताना केवळ आरती आणि दर्शनापुरते मर्यादित न राहता स्वच्छता, अन्नदान व समाजसेवा या गोष्टींना महत्त्व दिले पाहिजे. नवरात्र उत्सवात दरवर्षी ग्रुपच्या माध्यमातून भाविकांना प्रसाद वाटप केले जात आहे. केडगाव देवी मंदिरात दरवर्षी हजारो भाविक दर्शनासाठी येतात. त्यांना प्रसादरुपी फराळ वाटप करुन सेवा देण्यात आली आहे. त्याचबरोबर मंदिर परिसर स्वच्छ ठेवणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

सचिन चोपडा म्हणाले की, नवरात्र हा भक्ती व शक्तिपूजेचा उत्सव आहे. या उत्सवाला सामाजिक उपक्रमांची जोड देऊन हरदिनच्या माध्यमातून विविध कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. भाविकांना फराळ वाटप करुन स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छतेमुळे भक्ती अधिक पवित्र होते आणि प्रसन्न वातावरणात श्रद्धेला बळ मिळते. निरोगी आरोग्यासाठी देखील सार्वजनिक स्वच्छता महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.



नवरात्र उत्सवानिमित्त केडगाव येथे शिबिरात रक्तदान करताना युवक.

# नवरात्र उत्सवानिमित्त केडगाव येथील शिबिरात युवकांनी केले रक्तदान

नगर – केडगाव येथील जगदंबा तरुण मंडळ, शिवमुद्रा ग्रुप व माजी सभापती मनोज कोतकर यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र उत्सवानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमासह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर सातव्या माळेनिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिराला युवकांचा प्रतिसाद लाभला. धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक जाणिवा जागवणाऱ्या उपक्रमांना देखील यंदाच्या उत्सवात विशेष महत्त्व देण्यात आले. ४२ हून अधिक तरुणांनी रक्तदान केले. याप्रसंगी मनोज कोतकर, बाळासाहेब कोतकर, शाम कोतकर, अजित कोतकर, अण्णा शिंदे, भरत मतकर, नवनाथ कोतकर, राघू ठुबे, बंटी विरकर, ओंकार कोतकर, अक्षय कोतकर, सुहास साळुंके, रणजीत ठुबे, अजिंक्य कोतकर, शुभम कोतकर, सौरभ मतकर, शिवम राऊत, प्रसाद जमदाडे आदींसह नागरिक उपस्थित होते.

मनोज कोतकर म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे यंदाही जगदंबा तरुण मंडळ व शिवमुद्रा ग्रुपच्या माध्यमातून नवरात्र उत्सवानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात रक्तदान शिबिर दरवर्षी घेण्यात येतो. गरजूला नवजीवन देणारे रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचवण्यासाठी या रक्तदानाचा उपयोग होतो. धार्मिक सोहळ्यांना सामाजिक उपक्रमाची जोड देणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी अर्पण ब्लड बँकेचे डॉक्टर व सदस्य यांनी सहकार्य केले.

# विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेचे माहिती पत्रक व प्रवेश अर्ज ग्रामदैवत श्री विशाल गणपतीस अर्पण

नगर – अहिल्यानगर मधील वाडीयापार्क मैदानावर विजेता करंडक क्रिकेट स्पर्धा ४ ते १४ डिसेंबर या कालावधीत होणार आहेत. डे ॲण्ड नाईट पद्धतीने होणाऱ्या या स्पर्धेत मोजक्या संघाना प्रवेश दिला जाणार आहे. स्पर्धेतील विजेत्या संघास रुपये १ लाख, करंडक व उपविजेत्या संघास रुपये ७१ हजार व करंडक तसेच इतर हजारो रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहे, अशी माहिती माजी नगरसेवक विपुल शेटिया यांनी दिली.



नगरच्या वाडीया पार्क मैदानावर होणाऱ्या विजेता करंडक क्रिकेट स्पर्धेचे माहिती पत्रक व प्रवेश अर्ज ग्रामदैवत श्री विशाल गणपतीस पुजारी संगमनाथ महाराजांच्या हस्ते अर्पण करण्यात आले.

या स्पर्धेची नोंदणी सुरु करण्या आधी याचे माहिती पत्रक व प्रवेश अर्ज ग्रामदैवत श्री विशाल गणपतीच्या चरणी मंदिराचे महंत संगमनाथ महाराजांच्या हस्ते अर्पण करून श्री गणेशाची आरती केली. यावेळी जैन कॉन्फरन्सचे मार्गदर्शक अशोक बोरा, मर्चंट बँकेचे संचालक कमलेश भंडारी आदींसह क्लबचे सदस्य उपस्थित होते.

या स्पर्धांमध्ये आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेट स्पर्धांप्रमाणे आरटीएम कार्ड, डिआरएस रीव्ह्युव सिस्टिम तसेच इम्पॅक्ट प्लेअर, थर्ड अंपायर अशा नियमांचा समावेश करत आहोत. हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य आहे. या स्पर्धेतील सर्व सामन्यांचे युट्युब वर थेट प्रक्षेपण होणार आहे. या पूर्ण स्पर्धेमध्ये खेळाडू जेवढे षटकार मारतील तेवढे झाडे क्लबच्या वतीने लावून व संगोपन करण्याचा सामाजिक जाणीवेतून उपक्रम दरवर्षी राबवण्यात येतो.

अधिक माहितीसाठी हर्ष बोरा मोबाईल नंबर ९६८९३९७०२९ येथे संपर्क साधावा. क्रिकेट स्पर्धांचा आनंद घ्यावा, असे आवाहन विजेता क्रिकेट क्लबचे अमोल शिंगी व संयोजकांनी केले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### दूध पित असाल तर...

दूध पिल्यानंतर तुम्हाला पोटात पेटके, गॅस किंवा पोटफुगी येते का? जर असेल तर तुम्हाला दुग्धशर्करा असहिष्णुतेचा त्रास होत असेल. ही एक सामान्य पचन समस्या आहे जी जगभरातील लाखो लोकांना प्रभावित करते. हा आजार नाही, तर अशी स्थिती आहे ज्यामध्ये शरीर दुग्धशर्करा, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये आढळणारी साखर योग्यरित्या पचवू शकत नाही. त्यावर उपचार आणि व्यवस्थापन कसे करावे ते जाणून घेऊया. दुग्धजन्य पदार्थ टाळल्याने कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीची कमतरता होऊ शकते. म्हणून, सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे दूध, चीज, आईस्क्रीम आणि इतर दुग्धजन्य पदार्थ कमी करणे किंवा पूर्णपणे टाळणे. तुमच्या आहारात या पोषक तत्वांचे इतर स्रोत समाविष्ट करा, जसे की हिरव्या पालेभाज्या, बदाम, सार्डिन आणि संत्र्याचा रस.

## पाककला

### उपवासाचा नारळ हलवा

**साहित्य :** खवलेला नारळ दोन कप, दूध दोन कप, साखर एक कप, तूप चार टे. स्पून, वेलची पूड अर्धा टे.स्पून, काजू, बदाम आणि पिस्ते

**कृती :** सर्वात आधी एका पॅनमध्ये तूप गरम करा, काजू आणि बदाम हलकेच भाजून घ्या. आता किसलेला नारळ तुपात घाला आणि मंद आचेवर परतून घ्या. आता दूध घाला आणि मंद आचेवर दूध घट्ट होईपर्यंत शिजवत रहा. नंतर साखर घाला आणि चांगले ढवळून घ्या. साखर घातल्यानंतर हलवा थोडा पातळ होईल. ढवळत रहा. यानंतर, वेलची पावडर आणि काजू आणि बदाम घाला. तयार नारळाचा हलवा एका प्लेटमध्ये काढा व पिस्ता गार्निश करा. तयार आहे आपला कोकोनट हलवा गरम नक्कीच सर्व्ह करा.

## वास्तू

### दसरा व झाडूचे महत्त्व

* भारतीय संस्कृतीत, झाडू हे केवळ स्वच्छता करण्याचे साधन नाही, तर ते देवी लक्ष्मीचे प्रतीक मानले जाते.

* धार्मिक श्रद्धेनुसार, झाडू घरातील नकारात्मकता, गरिबी आणि घाण काढून सकारात्मक ऊर्जा आणि संपत्ती आकर्षित करतो.

* झाडू संपत्तीची देवी लक्ष्मीशी संबंधित आहे, कारण याने घरातील अशुद्धता दूर करण्यास मदत होते, ज्याप्रमाणे देवी लक्ष्मी गरिबी दूर करते आणि सुख आणि समृद्धी आणते.

* दसऱ्यापासून दिवाळीची स्वच्छता सुरू करणे पारंपारिक आहे आणि या दिवशी झाडू खरेदी करणे ही एक शुभ सुरुवात मानली जाते.

## सौंदर्य

आंघोळीच्या पाण्यात कडुलिंबाचे पाणी मिसळावे लागेल. कडुलिंबाचे पाणी तयार करण्यासाठी, प्रथम कडुलिंबाची पाने पूर्णपणे धुवा. ती पाण्यात घाला आणि उकळी आणा. नंतर, हे पाणी तुमच्या आंघोळीच्या पाण्यात मिसळा आणि आंघोळ करा. यामुळे तुमच्या घामातील बॅक्टेरिया नष्ट होण्यास मदत होते.

## सल्ला

स्वयंपाकघरात ठेवलेली भांडी व्यवस्थित करण्यासाठी ड्रॉवर डिव्हायडरचा वापर करावा. या ड्रॉवर दुभाजक ॲडजस्टेबल असतात, त्यामुळे तुम्ही भांडी व्यवस्थित ॲडजस्ट होतात. तसेच तुम्ही ड्रॉवर उघडल्यावर भांडी व्यवस्थित लावलेली दिसतात. तुम्ही ड्रॉवर डिव्हायडरच्या मदतीने तुमची कटलरी आणि छोटी भांडी सहज ठेवू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २ ऑक्टोबर २०२५

**दसरा, गांधी जयंती, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, उ.षा. ०९|१३, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

रावे लागतील. आरोग्य मध्यम राहील. व्यापार–व्यवसायात सावधगिरी बाळगा. मागील उधारी वसुल होईल.

**वृषभ :** कौटुंबिक वाद–विवाद टाळा. आज घरगुती जबाबदाऱ्यांमध्ये आपली प्रगती आपणास संतुष्टी देईल. शेअरमध्ये गुंतवणूक करू नका.

**मिथुन :** इच्छित कार्यात यश मिळेल. कौटुंबिक जबाबदारी वाढेल. आरोग्य उत्तम राहील. शुभ वार्ता मिळतील.

**कर्क :** एखाद्या महत्वाच्या प्रोजेक्टमध्ये यश मिळेल. मनोरंजनावर खर्च होण्याची शक्यता आहे. हसत खेळत दिवस जाईल.

**सिंह :** आर्थिक स्थिती संमिश्र राहील. कुटुंबातही वेळ चांगला जाईल. सामाजिक कामात सावधगिरी बाळगा. या आठवड्यात आपल्यावर लक्ष्मीची कृपा राहिल.

**कन्या :** देवाण–घेवाणीबाबत काळजीपूर्वक व्यवहार करा. अत्यंत व्यस्त राहाल. व्यापार व्यवसायात सावध राहावे. दिवस आनंदात जाईल.

**तूळ :** नोकरदारांनी कामात लक्ष द्यावे. वाहने काळजीपूर्वक चालवा. शत्रूंपासून सावध राहा. स्थिती अनुकूल राहील.

**वृश्चिक :** वरिष्ठ लोकांचे कामात सहकार्य मिळेल. अधिकारी आपणास सहकार्य करतील. कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील.

**धनु :** दिवस उत्तम राहील. महत्वाच्या कार्यात यश मिळेल. आरोग्याचा त्रास होईल. व्यापार–व्यवसायात जोखमीचे कार्य टाळा.


**मकर :** वडिलधाऱ्यांचे सहकार्य मिळेल. महत्वाच्या कामात सावधगिरी बाळगा. जोखमीच्या कार्यात पैसा गुंतवू नका.

**कुंभ :** आरोग्य देखील चांगले राहील. आर्थिक स्थिरतेसाठी वेळ उत्तम आहे. नोकरदार कामात व्यस्त राहातील. वाहने जपून चालवावीत. विरोधक पराभूत होतील.

**मीन :** प्रेमात स्थिती अनुकूल राहील. आपल्या प्रकृतीची काळजी घ्या. अधिकाऱ्यांशी वाद–विवाद टाळण्याचे प्रयत्न करा. आरोग्य देखील चांगले राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२७५ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२७४ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) परिचय ३) गोळा झालेले; संकलित; आय ६) अराजक; गोंधळाची स्थिती ८) मोठे गाव; शहर १०) ढीग; चळत; चवड ११) मोठा भाऊ; गुंड १२) कमतरता; उणीव; चणचण १४) खालचा ओठ १५) प्रशंसा; स्तुती १६) आशीर्वाद; खाली नसलेला; नवरा मुलगा १९) एका दिवसात आक्रमिलेला रस्ता; टप्पा २१) वर्तमान दिवस; चालू दिवस २२) यामिनी; रात्र २३) मालदार; श्रीमंत; धनवान

**उभे शब्द :-** १) एक अरबी देश २) सावध रहा; ध्यानात धर ३) मोठा; शक्तिमान; जास्त ४) कैफ; नशा; उन्मत्तपणा ५) याचा स्पर्श झाल्यावर लोखंडाचे सोने होते असे म्हणतात ७) जुना; प्राचीन ९) गदा धारण करणारा १३) अनेक जनावरे ज्याला बांधतात ती लांब एकच दोरी १४) देवादिकांचे अन्य रुपाने पृथ्वीवर येणे १७) सदऱ्याची गुंडी ज्यात अडकवितात ते छिद्र १८) वाद्यांचा मोठा आवाज १९) मराठी मांजर तर इंग्रजी पैसा २०) वेल; वल्लरी २१) मडके भाजण्याची कुंभाराची भट्टी

# ****** मुलांचे विश्व ******

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** रिकामी पाकीट कधीच तुमच्या यशाच्या आड येत नाहीत जेवढे रिकामी डोके आणि रिकामी मन यशात अडसर बनतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### सतत तोंड का येते?

अगं नको, ... मला हे खायला देऊ नकोस,.. खूप तोंड आलंय माझं... असं म्हणत गालावर हात ठेवून बसणाऱ्या अनेक व्यक्ती आपण आपल्या सभोवती पाहतो. तोंडात एखादा फोड येणे किंवा अल्सर होणे, याला आपण बोली भाषेत तोंड येणे असं म्हणतो. वारंवार होणारा हा त्रास खूपच भयंकर असतो. काही खाल्लं किंवा अगदी पाणी प्यायलं तरी खूपच वेदना होतात. त्यामुळे मग हा त्रास टाळण्यासाठी तोंड आल्यावर अनेकजण स्वत:ची उपासमार सुरू करतात. उपाशी राहिल्याने ही समस्या सुटत नाही. उलट आणखीनच वाढत जाते. कारण पोटात अन्न कमी असल्याने ॲसिडीटी होते, कुणाची उष्णता वाढते. त्यामुळे मग अल्सरचा त्रास आपोआपच आणखी वाढत जातो.

शरीरातील उष्णता वाढल्यामुळे तोंड येते. मसालेदार पदार्थ खाणे काही जणांच्या प्रकृतीला मानवत नाही. त्यामुळेही तोंड येऊ शकते. तोंड येणे या समस्येचे मुळ बऱ्याचदा तुमच्या पचन संस्थेमध्ये असते. पचनाचे त्रास असणाऱ्या व्यक्तींचे वारंवार तोंड येते. शरीरात व्हिटॅमिन बी ची कमतरता असल्यावरही तोंड येण्याचे प्रमाण वाढते. पालेभाज्या न खाणाऱ्या किंवा खूपच कमी प्रमाणात खाणाऱ्या व्यक्तींना असा त्रास होतो.

त्याचबरोबर सतत चहा- कॉफी घेणे, किंवा तंबाखू, धूम्रपान, दारू यासारखी व्यसने असणाऱ्या व्यक्तींचे तोंड येते. पोटात जंत असतील किंवा काही जुनाट आजार असतील तर तरीही तोंड येते.

परंतु यावर काही घरगुती उपायही आहेत. कोथिंबीरीचा रस काढा. एखादा चमचा रस तोंडात घ्या आणि एखादा मिनिटभर तोंडात ठेवा. चूळ भरल्यासारखे करा. दिवसातून २ ते ३ वेळा हा उपाय केल्यास एक दोन दिवसातच आराम पडेल.

विलायची पावडर आणि मध एकत्र करून घ्या. हे मिश्रण तोंड आले असेल, तेथे लावा. पेरूच्या झाडाची पाने पाण्यात उकळून घ्या. कोमट झाल्यावर या पाण्याने गुळण्या करा. पेरूची एकदम रापलेली आणि अतिशय कोवळी अशी दोन्ही प्रकारची पाने घेऊ नका. मध्यम स्वरूपाची पाने घ्या. एक ग्लास कोमट पाणी घ्या. त्यामध्ये एक टी स्पून मीठ घाला. या पाण्याने गुळण्या करा. दिवसातून ३ ते ४ वेळेस हा प्रयोग केला तरी हरकत नाही. पटकन आराम वाटेल. तुळशीची ४ ते ५ वेळेस तुळशीची ५- ५ पाने बारीक चावून खा. खोबऱ्याचे तुकडे बारीक चावून खाल्ल्यानेही तोंडातील जखमा कमी होतात.

### दसरा व आपट्याची पाने

विजयादशमीच्या दिवशी आपट्याची पाने वाटण्याची प्रथा खूप जुनी आहे आणि यामागे काही पौराणिक आणि सांस्कृतिक कारणे आहेत.

महाभारतानुसार अर्जुनाने आपल्या अज्ञातवासात शमी वृक्षाच्या पाठीमागे आपली शस्त्रे लपवून ठेवली होती. विजयादशमीच्या दिवशी त्यांनी ही शस्त्रे काढून विराट युद्धात विजय मिळवला. त्यामुळे शमी वृक्षाला खूप महत्त्व प्राप्त झाले.

शमी वृक्षाला देवीचे स्वरूप मानले जाते. या वृक्षाची पूजा केल्याने देवी प्रसन्न होतात आणि आपल्या भक्तांना आशीर्वाद देतात असे मानले जाते.

प्रभू श्रीरामा यांच्या राज्यात खूप संपत्ती होती. परंतु प्रभूंनी ती दान करत वानप्रस्थाश्रम स्वीकारले. मात्र तेव्हा त्यांचे कुलगुरू कौत्स मूनी यांनी प्रभू रामाकडे १४ कोटी सुवर्ण मुद्रा मागितल्या. अशात प्रभू रामाकडे काहीच नसताना गुरूंची मागणी पूर्ण करण्यासाठी त्यांनी इंद्र देवांना युद्धाचे आव्हान दिले. या युद्धात इंद्र देवाचा पराभव झाला. तेव्हा प्रभू रामांनी मला राज्य नको मात्र फक्त १४ कोटी सुवर्ण मुद्रा हव्या अशी मागणी केली. यानंतर इंद्र देवांनी पृथ्वीवरील आपट्यांच्या पानावर सुवर्ण मुद्रा सोडली. यामुळे विजयदशमीला सोने म्हणून आपट्यांची पाने लुटली जातात.

विजयादशमीच्या दिवशी आपट्याची पाने वाटण्याची प्रथा खूप जुनी आणि पवित्र आहे. या प्रथेमागे धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय कारणे आहेत. आपट्याची पाने वाटून आपण आपल्या जीवनात सकारात्मक बदल करू शकतो आणि देवीचे आशीर्वाद प्राप्त करू शकतो.

तसेच ही पाने मोठ्या माणसांना देऊन त्यांचा आशीर्वाद घेण्याची परंपरा असल्याने त्यांच्या प्रती आदर दर्शवण्याची आणि दुरावलेली नाती दूर करून जवळ येण्याची ही संधी समजावी.

## जीवन का अमृत (भाग १)



### गुरू और परमात्मा

कि हम अपने आपको सही रूप में जानें, अपने आपको पहिचानें। इसका क्या मतलब हुआ? अपने आप को तो हर कोई शीशे में देखता है और पहचानता है। हर एक की शक्ल दूसरे से भिन्न है। यहाँ पर वे बाहरी रूप से अपने आपको पहिचानने की बात नहीं कर रहे हैं। महापुरुष हमें बार-बार समझाते हैं कि हमारा असली रूप आत्मिक है, इसी रूप को हमने जानना है, पहचानना है और उस रूप को हम तभी पहचान सकते हैं, जब हमें यक़ीन हो जाए कि दुनिया में हर चीज़, हर कार्य प्रभु के हुक्म से हो रहा है। यही बात यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

**कीता लोड़हि सो प्रभ होई।।**
**तुझ बिनु दूजा नाही कोइ।।**

वे हमें समझा रहे हैं कि जो कुछ भी हो चुका है, जो कुछ भी हो रहा है और जो आगे होगा, सब परमात्मा की इच्छा से हो रहा है, उसके भाणे में हो रहा है, उसकी रज़ा से हो रहा है, उसकी मर्जी से हो रहा है, उसके हुक्म से हो रहा है, उसकी अपनी मौज में हो रहा है। हर एक कार्य के पीछे कोई तो वजह है, जो हमारी समझ में नहीं आती। हमें लगता है, ये कार्य ऐसे ही हो गए। लेकिन यहाँ पर गुरु साहब हमें समझा रहे हैं कि सृष्टि में जो कुछ आज तक हुआ है, जो हो रहा है और जो आगे होगा, वह सब परमात्मा की मर्जी से हो रहा है, उसके भाणे में हो रहा है, उसके हुक्म से हो रहा है। उसके हुक्म के मुताबिक हमें अपनी जिंदगी को ढालना है, जैसा कि गुरुवाणी में आया है :

**तेरा भाणा मीठा लागे।**

हमें अपनी जिंदगी ऐसे जीनी है कि हम हर हालत में प्रभु का शुक्राना अदा करें। उसी ने हमें जिंदगी दी है। हम बहुत खुशकिस्मत हैं कि प्रभु ने दया-मेहर करके हमें यह मानव चोला बख़्शा। ८४ लाख जियाजून में सबसे उत्तम, सबसे अव्वल यह नर-नारायणी देह है और यह बड़े भाग्यों से मिलती है, जब प्रभु की ख़ास दया-मेहर हो।

अगर हम इन्द्रियों के वश में ही रहे, तो फिर अपने आपको जान नहीं सकेंगे। इन्द्रियाँ मन को बाहरी भोगों में खींच रही हैं और चूंकि आत्मा मन के साथ बंधी पड़ी है, उसका ध्यान बाहरी दुनिया में भटक रहा है। अगर आप दो पल के लिए सोचें, तो पायेंगे कि हमारे सारे कार्य बाहर की दुनिया के लिए होते हैं। बच्चों का पालन पोषण करना हो, दफ़्तर का काम करना हो, घर का काम करना हो, पढ़ाई-लिखाई करनी हो, सुबह से शाम तक हम दुनिया के कार्यों में व्यस्त रहते हैं। यह मौका, जो हमें मिला है, अपने आपको जानने का, हमारे हाथ से निकला जा रहा है। (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

**१६) टमाटर की फसल : जमीन को शक्तिशाली बनाने के लिए -**

१. प्रति एकड़ ६ टन गोबर की खाद या हरियाली की खाद जमीन में मिलाकर पौधे लगाने के लिए जमीन तैयार करें।

२. पौधे लगाते समय और बाद में प्रति २० दिन के बाद २०० ली. जीवामृत एक एकड़ जमीन में जमीन गीली हो तब शाम के समय छिड़कायें या पानी के साथ छोड़ दें।

३. फल-फूल लगते समय एक एकड़ जमीन के लिए एक टन केंचुवे की खाद, ६० किलो अनाज की खाद और ट्रायकोडर्मा फफूंदी एक किलो, नत्र, स्फुरद और पोटाश की उपलब्धि करानेवाले जीवाणु संवर्धक प्रति एक किलो मिलाकर जमीन गीली हो तब जमीन में छोड़ दें।

४. नीम की खली ५० किलो, एक एकड़ में पौधों के ऊपर से जमीन पर छिड़कायें।

**मिक्स फसल -** १. फसल के चारों ओर एक लाइन मकई, एक लाइन चौलाई, १५ लाइन टमाटर की फिर एक लाइन चौलाई और एक लाइन गेंदे के फूल के पौधे इस प्रकार मिक्स करें।

२. टमाटर की १५ लाइन में भी २% मकई अवश्य मिक्स करें। एक हजार स्क्वे. फीट में एक तुलसी मका पौधा लगाना भी आवश्यक है।

**बीज संस्कार -** १. बीज को कपड़े में बांधकर रात भर गोमूत्र में डुबोकर रखें, फिर उस बीज को सुखाके बीजामृत लगाकर ऊपर से १०० ग्रॅम बीज के लिए २ ग्राम ट्रायकोडर्मा फिर २ ग्राम ॲझोटोबॅक्टर और २ ग्राम पी.एस.बी. जीवाणु संवर्धक का लेप चढ़ाकर बीज जमीन में बुवाई करें। जहाँ बीज बुवाई करनी है वहाँ गोबर की खाद अथवा केंचवे की खाद, नीम का पाउडर जमीन में अवश्य मिलायें।

२. पौधे लगाते समय २ ली. बीजामृत में ५० ग्राम ट्रायकोडर्मा, २५० ग्राम ॲझोटोबॅक्टर और २५० ग्राम पी.एस.बी. जीवाणु संवर्धक मिलाकर पौधों की जड़ें आधा घण्टे तक डुबोकर रखें फिर पौधे लगायें।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गण्या - साहेब मला फोनवर धमक्या मिळत आहेत
पोलीस - कोण आहे तो जो तुम्हाला धमक्या देत आहे?
गण्या - एम.एस.ई.बी.वाले म्हणतात...
बिल नाही भरल तर कापून टाकीन

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* हेनले पासपोर्ट इंडेक्स २०२२ नुसार भारताचा कितवा क्रमांक आहे?
- ८३ वा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

पाळी येण्यापूर्वी आठ ते दहा दिवस आहारातील मिठाचे प्रमाण कमी केले असता हा त्रास खूप कमी प्रमाणात जाणवतो. अशा वेळी घरातील इतर सदस्यांनी तिच्या भावना समजून घ्याव्यात.

या आजारावर कमीतकमी तीन महिने उपचार करावेत. यामध्ये 'ब', 'इ' जीवनसत्त्व. इव्हिनिंग प्रायमिरोज ऑइल, कॉडलिव्हर ऑइल, ओमेगा-३ फॅटीॲसिड अशा प्रकारची औषधे उपयोगी पडतात. या औषधांसोबत शतावरी, अशोका, मंजिष्ठा, लोध्र यांनी युक्त गर्भाशयावर कार्य करणारे युटेराइन टॉनिक सकाळ-संध्याकाळ दोन-दोन चमचे द्यावे. यावर M2-tone, Restone नावाची औषधे उपलब्ध आहेत. मानसिक स्थैर्य मिळण्यासाठी, शरीरातील मिठाचे प्रमाण कमी करण्यासाठी, शरीराची लवचीकता वाढवण्यासाठी योगासने, सूर्यनमस्कार, ध्यानधारणा, ओंकार, प्राणायाम यांची नियमित साधना करावी. अशा प्रकारे ॲलोपॅथी व आयुर्वेदशास्त्र यांच्या संयुक्त उपचाराने या आजारावर मात करता येते.

**रुग्णानुभव ६ -**


श्वेता ३५ वर्षांची पत्रकार स्त्री होती. तिला पाळी येण्याआधी आठ ते दहा दिवस प्रीमेनस्ट्रअल लक्षणांचा त्रास होत असे. हा त्रास इतका तीव्र होता, की गाडी चालवताना एखादा गतिरोधक आला व त्यावरून गाडी गेली तरी तिच्या स्तनांमध्ये भयंकर वेदना होत असे. तिची पत्रकारितेची नोकरी फिरतीची असल्याने गाडीवरून तिचा वारंवार प्रवास होत असे. नोकरीतील ताण आणि घराची जबाबदारी यांमुळे ती कायम ताणाखाली वावरत असे. मी तिला पाळीच्या आधी पाच दिवस सहचर तेलाची ५० मिली मात्रा बस्ती सलग सात दिवस घेण्यास सांगितली. 'ब' जीवनसत्त्व, इव्हिनिंग प्रायम रोझ ऑइल, साइरप एम२-टोन ही औषधे सुरू केली. तिच्या व्यस्त जीवनातून स्वत:साठी एक तास काढण्यास सांगितला. यामध्ये योगासने, सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यानधारणा करण्यास सांगितले. तिचा गायनाचा छंद जोपासण्यास सांगितला. मीठ कमी करण्यास सांगितले. सलग तीन एक महिने उपचार केल्यामुळे प्रीमेनस्टुअल लक्षणांचा त्रास पूर्णपणे थांबला. आता ती तिची नोकरी व घरची जबाबदारी दोन्हीही गोष्टी आत्मविश्वासपूर्वक आनंदाने पार पाडत आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# कॅलिडोस्कोप

## रात्रीच्या चांदण्यात ताजमहल पाहण्याचे सुख काही और!



दिवसा ताजमहालच्या पांढऱ्या संगमरवराचे सौंदर्य सर्वांनाच दिसते; पण रात्रीच्या चांदण्यात ताजमहल पाहण्याचे सुख काही औरच आहे. रात्री त्याचे स्वरूपच बदलते, असे वाटते. लख्ख चांदण्यांचा संगमरवरावर पडणारा प्रकाश आणि त्याच्या समोर असलेल्या यमुनेच्या पाण्यात दिसणारी चांदण्याची लखलख एखाद्या स्वप्नातील जगापेक्षा कमी वाटत नाही. रात्रीचे सर्वात सुंदर दृश्य म्हणजे ताजमहालच्या भिंतींवर पडणारा चांदण्याचा प्रकाश. त्या प्रकाशात त्याचे सौंदर्य काही वेगळेच दिसते. हे दृश्य ते एखाद्या परीकथेसारखे भासते. रात्रीच्या शांततेत यमुना नदीच्या पाण्यात ताजमहालचे प्रतिबिंब एका आरशासारखे दिसते. जणू ती पौर्णिमेच्या चंद्राचीच छबी असावी. ताऱ्यांमध्ये चमकणारा ताजमहाल पाहून डोळ्यांना विश्वास बसत नाही. ते दृश्य खरोखरच डोळ्यांना सुखावणारे असते. ताजमहाल रात्रीच्या विशेष प्रकाशात चमकतो, तेव्हा त्याचे कोरीव काम आणि संगमरवरी तपशील आणखी स्पष्ट दिसतात. रात्रीच्या प्रकाशात चमकणाऱ्या भिंती त्याचे सौंदर्य अजून वाढवतात. रात्रीच्या वेळी तुम्ही ताजमहाल त्याच्या बागेतून पाहता, तेव्हा आजूबाजूला असलेली शांतता आणि मध्यभागी उभे असलेले ते स्मारक मनाला शांततेची भावना देते. ती शांतता कोणत्याही मेडीटेशनपेक्षा कमी असत नाही. या अंधारात फक्त ताजमहलच नाही, तर त्याच्या आजूबाजूला उभे असलेले मिनारदेखील ताजमहालचे सौंदर्य वाढवतात. ताजमहालची सोनेरी आभा तर पाहण्यासारखी असते. चंद्रप्रकाश आणि त्यातील प्रकाशाच्या संयोगामुळे कधी कधी ताजमहालवर सोनेरी आभा दिसते, जी त्याला एक सोनेरी असे जादुई रूप देते. या अंधारात फक्त ताजमहलच नाही, तर त्याच्या आजूबाजूला उभे असलेले मिनारदेखील ताजमहालचे सौंदर्य वाढवतात. चंद्रप्रकाश आणि त्यातील प्रकाशाच्या संयोगामुळे, कधी कधी ताजमहालावर सोनेरी आभा दिसते. ती त्याला एक सोनेरी असे जादुई रूप देते. रात्रीच्या शांततेत ताजमहाल पाहण्यासाठी येणाऱ्या जोडप्यांसाठी हे ठिकाण म्हणजे खरोखरच प्रेमाचे प्रतिक काय असावे, याची जाणीव करून देईल. सूर्य पूर्णपणे मावळतो, तेव्हा ताजमहाल हळूहळू त्या आकाशातील ताऱ्यांमध्ये एकरूप झाल्यासारखा वाटतो. हे दृश्य पाहणारे एकूण अनुभव कधीही विसरु शकणार नाहीत.



## दानशूर भिकारी

श्रीमंत लोक मंदिरात दानधर्म करतात. मोठाल्या देणग्या देतात. काही भक्त सोन्या-चांदीचे दागिने अर्पण करतात. शिर्डीच्या साईबाबा मंदिरालाही बरंच दान मिळतं. आंध्र प्रदेशमधल्या विजयवाडा इथल्या साईबाबा मंदिरालाही मोठं दान मिळालं आहे. विशेष म्हणजे हे दान एका भिकाऱ्याने दिलं आहे. ७३ वर्षांच्या या भिकाऱ्याने सात वर्षांच्या काळात तब्बल आठ लाख रुपये दान म्हणून दिले! दानधर्म केल्यामुळे आपल्याला अधिक भीक मिळाल्याचं या भिकाऱ्याचं म्हणणं आहे. यादी रेड्डी असं या भिकाऱ्याचं नाव. यादी याच मंदिराबाहेर भीक मागत असत. मंदिर प्रशासनानेही यादी यांचं कौतुक केलं आहे. रेड्डी यांनी जवळपास ४० वर्षं रिक्षा चालवली. मात्र काही काळानंतर त्यांना गुडघेदुखी सतावू लागली. यामुळे त्यांनी रिक्षा चालवणं सोडलं. मग त्यांनी उदरनिर्वाहासाठी भीक मागायला सुरूवात केली. यादी यांनी पहिल्यावेळी मंदिराला एक लाख रुपये दान दिलं. मंदिरात दान दिल्यानंतर आपल्या उत्पन्नात वाढ झाल्याचं यादी यांचं म्हणणं आहे. या दानधर्मामुळे आपल्याला नवी ओळख मिळाल्याचंही ते सांगतात. त्यांनी दिलेल्या पैशांमधून मंदिराच्या डागडुजीची कामं करण्यात आली आहेत. तसंच यादी यांच्या मदतीने गोशाळाही बांधण्यात येणार आहे. यादी यांचं हे कार्य कौतुकास्पद आहे, पण भीक मागून माणूस एवढे पैसे कमाऊ शकतो याचेही आश्चर्य वाटत आहे.

## आत्म्याची खरेदी ३३ कोटींना!

पैशाने तुम्ही काहीही खरेदी करु शकता; परंतु एखाद्याचा आत्मा आणि मन खरेदी करू शकत नाही, ही म्हण आता खोटी ठरणार आहे. कारण एका व्यक्तीने तब्बल चार दशलक्ष डॉलर (सुमारे ३३ कोटी रुपये) मोजून तरुणीचा आत्मा खेरदी केला. हे ऐकायला थोडे विचित्र वाटेल. या बातमीने स्थानिक प्रसारमाध्यमांपासून 'सोशल मीडिया'पर्यंत हंगामा माजवला. आता या आत्म्याचे नेमके करायचे काय, असा त्याला प्रश्न पडला आहे.






एका महिलेने कथितपणे आपला 'आत्मा' विकून सुमारे ३३ कोटी रुपये मिळवले आहेत. या रकमेतून तिने बाहुल्यांचे कलेक्शन आणि कॉन्सर्ट तिकीट खरेदी केले. रशियाच्या सोशल नेटवर्कींग प्लॅटफॉर्मवर एक व्यक्ती दिमित्री यांनी मजेने एक पोस्ट केली होती. त्यात त्यांनी लिहिले होते, की त्यांना आत्मा विकत घ्यायचा आहे. सुरुवातीला लोकांनी ही मस्करी मानली; परंतु लवकरच ही गोष्ट खरी असल्याचे सिद्ध झाले. करिना नावाच्या या तरुणीने ही ऑफर स्वीकारली. हैराण करणारी बाब म्हणजे यथावकाश या दोघांमध्ये रक्ताने लिहिलेला करार झाला. काही दिवसांनी दिमित्री यांनी यासंदर्भातील रक्ताने लिहिलेला करार 'सोशल मीडिया'वर पोस्ट केला. कॅप्शनमध्ये लिहिले की मी आता पहिला आत्मा खरेदी केला आहे. हा करार रक्ताने साईन केला आहे. करिनाने स्थानिया मीडियाला सांगितले, की आत्मा विकल्याचा आपल्याला काहीही पश्चाताप नाही किंवा लोकांच्या टीकेची पर्वा नाही. करिनाने सांगितले, की रक्कम थेट तिच्या बँक अकाऊंटला गेली आणि त्यानंतर करिनाने बाहुल्यांचे कलेक्शन खरेदी केले. तसेच प्रसिद्ध गायिका नादेज्दा काडिशेवा यांच्या कॉन्सर्टचे तिकिट खरेदी केले. दुसरीकडे दिमित्री यांचे म्हणणे आहे, की त्यांनी मजेत ही ऑफर दिली होती. मला आशा नव्हती. एखादी महिला खरेच ही ऑफर स्वीकारेल. आता मला स्वत:ला कळत नाही की खरेदी केलेल्या आत्म्याचे काय करायचे! ही घटना एखाद्या हॉरर चित्रपटाच्या पटकथेसारखी वाटते. 'सोशल मीडिया'वर अनेक लोकांनी यास सैतानी प्रवृतीशी जोडून टीका केली आहे.

## अबब! केवढं हे कासव


कोट्यवधी वर्षांपूर्वी पृथ्वीवर डायनासोर नामक महाभयंकर आणि महाकाय प्राण्यांचं अस्तित्व होतं. मात्र हे प्राणी या पृथ्वीतलावरून नामशेष झाले. या डायनासोरचे जीवाश्मही सापडले आहेत. या जीवाश्मांवर शास्त्रज्ञ संशोधन करत असतात. तो काळ उलगडण्याचा प्रयत्न सध्या केला जातो. दक्षिण अमेरिकेतल्या कोलंबियामधल्या ताताकोआ वाळवंटात असंच एक भलं मोठं जीवाश्म सापडलं. या जीवाश्माचा आकार एखाद्या गाडीएवढा आहे. हे एका कासवाचं जीवाश्म आहे. एवढ्या मोठ्या आकाराचं जीवाश्म बघून शास्त्रज्ञांनाही आश्चर्याचा धक्का बसला. या प्रचंड मोठ्या कासवाची लांबी १३ फूट आणि वजन २.५ टन असावं, असा अंदाज व्यक्त केला गेला. अशी कासवं साधारण १.३ कोटी वर्षांपूर्वी दक्षिण अमेरिकेत आढळत असत. या जीवाश्माला 'स्टुपेंडेमी जिग्राफिकस' असं नाव देण्यात आलं आहे. कासवाला शिंगं असल्याचं आपण कधी ऐकलेलं नाही. पण नर स्टुपेंडेमी कासवाच्या कवचाच्या दोन्ही बाजूंना समोरच्या बाजूला शिंगं होती. म्हणजेच ही कासवं किती महाकाय आणि भयंकर असतील याचा अंदाज बांधलेलाच बरा. ही कासवं या शिंगांचा वापर स्वत:च्या सुरक्षेसाठी करत असावीत, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. अर्थात याआधीही स्टुपेंडेमी कासवाचं जीवाश्म सापडलं होतं. १९७० मध्येही असंच एक जीवाश्म सापडलं होतं. पण त्यावेळी या प्रजातीबद्दल फारशी माहिती मिळाली नव्हती. सीगोईंग आर्किलोन हे



पृथ्वीतलावरचं सर्वात मोठं कासव होतं. त्यानंतर आकाराच्या बाबतीत स्टुपेंडेमीचा क्रमांक लागतो. सीगोईंग आर्किलोन डायनासोर युगाच्या अंताच्या वेळी म्हणजेच जवळपास सात कोटी वर्षांपूर्वी या पृथ्वीवर अस्तित्वात होते, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. एवढी मोठी कासवं पाहिल्यानंतर कोणाच्याही मनात धडकी भरेल.

## अमिबा खरोखरच मेंदू खातो का?

मेंदू खाणारा अमिबा खरोखरच मानवी मेंदू खातो का? मेंदू खाणारा अमिबा एक प्राणघातक आजार निर्माण करतो. एकदा संसर्ग झाला, की जगणे अत्यंत कठीण होते. तथापि, हा आजार संसर्गजन्य नाही, म्हणजेच तो एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरत नाही. मानवी शरीरात ३० ट्रिलियनपेक्षा जास्त पेशी असतात, तर अमिबा हा फक्त एक पेशी असलेला जीव आहे. या एकाच पेशीचा वापर करून अमिबा त्याचे अन्न शोधते, ते खातो, पचवतो आणि नंतर त्याचा कचरा बाहेर टाकते. पाण्याच्या साठ्यात आढळणाऱ्या अमिबाच्या एका प्रजातीने मानवांमध्ये आरोग्याची चिंता निर्माण केली आहे. खरे तर, या वर्षी भारतातील केरळ राज्यात 'मेंदू खाणारा अमिबा' या व्याधीची ६५ हून अधिक प्रकरणे नोंदवली गेली आहेत. त्यामुळे १८ लोकांचा मृत्यू झाला आहे. या अमिबाला वैज्ञानिकदृष्ट्या 'नेग्लेरिया फाउलेरी' म्हणून ओळखले जाते. 'यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन' (सीडीसी) च्या वेबसाइटनुसार, मेंदू खाणारा अमिबा गोड्या पाण्यातील तलाव, जलाशय, नद्या, गरम पाण्याचे झरे आणि मातीमध्ये वाढतो. योग्यरित्या देखभाल न केलेले स्विमिंग पूलदेखील या अमिबाच्या प्रजननाचा धोका निर्माण करतात. हा अमिबा असलेल्या पाण्यात आंघोळ करणे अत्यंत धोकादायक आहे. खरे तर आंघोळ करताना हा अमिबा नाकातून शरीरात प्रवेश करू शकतो आणि नंतर



मेंदूपर्यंत पोहोचू शकतो. गेल्या वर्षी मे ते जुलै या कालावधीत केरळमध्ये या व्याधीचे चार रुग्ण आढळले आणि चारही प्रकरणांमध्ये बाधित मुलांचा मृत्यू झाला. या वर्षी नोंदवलेल्या ६७ प्रकरणांपैकी १८ लोकांचा मृत्यू झाला आहे. 'सीडीसी'च्या मते १९६२ ते २०२४ दरम्यान अमेरिकेत या आजाराचे १६७ रुग्ण आढळले. आणि त्यापैकी फक्त चारजणच वाचले. या अमिबाबद्दलचा एक अभ्यास गेल्या वर्षी 'यूएस नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'च्या वेबसाइटवर प्रकाशित झाला होता. त्यानुसार, अंटार्क्टिका वगळता जगातील प्रत्येक देशात या अमिबाची उपस्थिती नोंदवली गेली आहे. १९६५ ते २०१८ दरम्यान जगभरात फक्त ३८० प्रकरणे नोंदवली गेली. हे खूपच दुर्मिळ आहे; परंतु धोकादायकदेखील आहे. या अभ्यासानुसार, हा अमिबा त्याचे प्रजनन चक्र सुरु असताना मानवांमध्ये प्रवेश करतो. मेंदूत प्रवेश केल्यानंतर, हा अमिबा केवळ मेंदूच्या ऊतींचा नाश करत नाही, तर शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीवरही हल्ला करतो. मेंदूतील संसर्गामुळे शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीकडून तीव्र प्रतिक्रिया निर्माण होते. या प्रतिसादामुळे अमिबा मरत नाही; परंतु त्यामुळे मेंदूला तीव्र सूज येते. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये उलट्या, ताप, डोकेदुखी आणि सुस्ती यांचा समावेश होतो. रोग वाढत जातो, तसतसा गोंधळ वाढणे, मान ताठ होणे, प्रकाशाची भीती आणि झटके येणे यासारखी लक्षणे दिसून येतात. 'सीडीसी'च्या मते, बहुतेक लोक लक्षणे दिसू लागल्यानंतर एक ते १८ दिवसांच्या आत मरतात. बळी सामान्यतः प्रथम कोमात जातो आणि नंतर मरतो.



## सात्विक नाईट क्लब

नाईट क्लब म्हटला की दिवसभर ढणढणाट सुरू असतो. ठेक्यावरची हिंदी, इंग्रजी, पंजाबी गाणी वाजत असतात. या ठेक्यावर तरुणाई बेभान होऊन नाचत असते. नाईट क्लबमध्ये पाश्चात्य संस्कृती नांदते. इथे पाश्चिमात्य नृत्य आणि पाश्चिमात्य संगीताचा जोर असतो. पण एखाद्या नाईट क्लबमध्ये संस्कृती गीतं वाजू लागली तर... संस्कृतमध्ये मंत्र असतात, भजनं असतात. नाईट क्लबमध्ये संस्कृत गाणी कशी वाजू शकतील, असा प्रश्न तुमच्या मनात येणं अगदी स्वाभाविक आहे. मात्र असा एक नाईट क्लब आहे. या नाईट क्लबमध्ये लोक संस्कृत गाण्यांवर थिरकतात. महत्त्वाची बाब म्हणजे हा नाईट क्लब भारतात नाही तर भारतापासून दूर असणाऱ्या एका देशात आहे. अर्जेंटिनातला हा नाईट क्लब म्हणूनच अनोखा ठरतो. अर्जेंटिनाची राजधानी ब्युनस-आयर्समध्ये 'ग्रोव' नावाचा एक नाईट क्लब आहे. इथे गणेश शरणम, गोविंदा गोविंदा, जय जय राधा रमण हरी बोल, जय कृष्ण हरे अशी गाणी वाजतात. या नाईट क्लबमध्ये एकाच वेळी ८०० लोक थिरकतात. या नाईट क्लबमध्ये मद्य मिळत नाही. तसंच इथे येणारे लोक धूम्रपानही करत नाहीत. इथे मांसाहाराला मनाई आहे. अमली पदार्थांचं तर नावही काढता येत नाही. म्हणजेच अत्यंत सात्विक आणि धार्मिक असा हा नाईट क्लब आहे. इथे सॉफ्ट ड्रिंक्स, फळांचे रस आणि शुद्ध शाकाहारी भोजन मिळतं. अर्जेंटिनासारख्या दक्षिण अमेरिकेतल्या देशात असा नाईट क्लब असणं ही अनोखी बाब म्हटली पाहिजे. या नाईट क्लबला एकदा तरी भेट द्यायला हवी.

## नळातून बाहेर पडलं मद्य!

घरातल्या पाण्याचा नळ उघडल्यानंतर त्यातून पाण्याऐवजी मद्य बाहेर पडू लागलं तर... आपल्याला आश्चर्याचा धक्काच बसेल. हा कोणाचा तरी खोडसाळपणा आहे असं वाटून जाईल. केरळमध्ये असाच विचित्र प्रकार घडला. या राज्यातल्या त्रिसूरमधल्या चलाकुडी तालुक्यातल्या सोलोमन ॲव्हेन्यू अपार्टमेंटमधले लोक नळातून मद्य येऊ लागल्याचं बघून आश्चर्यचकित झाले. सकाळी नळ उघडल्यानंतर त्यातून भुरकट रंगाचं पाणी येऊ लागलं. पाण्याला विचित्र गंधही होता. यामुळे इथले रहिवासी गोंधळून गेले. हे मद्य असल्याचं लक्षात आल्यानंतर सर्वांना धक्काच बसला. कोणी तरी खोडसाळपणा करून टाकीत मद्य मिसळल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. मात्र असा कोणताही प्रकार



घडला नसल्याचं कळल्यानंतर रहिवाश्यांनी नगर परिषदेकडे तक्रार केली. मग प्रशासन कामाला लागलं. बराच शोध घेतल्यानंतर महसूल विभागाच्या चुकीमुळे हा गोंधळ झाल्याचं लक्षात आलं. महसूल विभागाने जवळपास सहा हजार लीटर मद्य जप्त केलं आणि ते एका खड्यात टाकून दिलं. हे मद्य जवळच्या विहिरीत मिसळलं. याच विहिरीतून या वसाहतीतल्या लोकांना पाणीपुरवठा होतो. यानंतर सगळा उलगडा झाला. यानंतर या विहिरीच्या साफसफाईचं काम सुरू करण्यात आलं. महसूल विभागाच्या चुकीमुळे या इमारतीतल्या लोकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला.

## विमानात ३५ हजार फुटावर वायफाय

'एअर इंडिया'ने अलीकडेच घोषणा केली आहे, की ते आपल्या काही विमानांमध्ये उड्डाणादरम्यान प्रवाशांना वाय-फाय सुविधा प्रदान करतील. ही सुविधा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही उड्डाणांमध्ये उपलब्ध असेल. तथापि, ही पहिलीच वेळ नाही, जेव्हा एखादी विमान कंपनी ३५ हजार फूट उंचीवर प्रवाशांना वाय-फाय सुविधा प्रदान करेल. जगभरातील अनेक विमान कंपन्या आधीच ही सुविधा देत आहेत. विमानात बसवलेला अँटेना जमिनीवरील जवळच्या टॉवरवरून सिग्नल पकडतो. विमान जमिनीवर टॉवर नसलेल्या क्षेत्रातून जाईपर्यंत हे सिग्नल राहतात. या तंत्रज्ञानात जमिनीवर बसवलेले टॉवर सिग्नल वरच्या दिशेने प्रक्षेपित करतात. यामध्ये ऑन-बोर्ड अँटेना विमानाच्या खाली बसवलेला असतो. 'सॅटेलाइट सिस्टीम' या तंत्रज्ञानात, वाय-फाय सिग्नल उपग्रहाद्वारे येतात. या तंत्रज्ञानात उपग्रहाद्वारे ग्राउंड





स्टेशनवरून विमानांमध्ये इंटरनेट पाठवले जाते. यामध्ये विमानाच्या वरच्या बाजूला ऑन-बोर्ड अँटेना बसवला जातो. आज विमानांमध्ये वाय-फायसाठी या तंत्रज्ञानाचा वापर जास्त केला जात आहे. एलन मस्क यांची स्टारलिंक ही कंपनी या तंत्रज्ञानावर इंटरनेट पुरवते. जमिन किंवा उपग्रह प्रणालींमधून विमानात बसवलेल्या अँटेनामधून इंटरनेट सिग्नल ऑन-बोर्ड राउटरवर प्रसारित केले जातात. या राउटरद्वारे, विमानात बसलेले प्रवासी त्यांच्या फोन, लॅपटॉप इत्यादींशी वाय-फाय कनेक्ट करू शकतात.

विमान उड्डाणानंतर एका विशिष्ट उंचीवर (सुमारे दहा हजार फूट) पोहोचते, तेव्हाच वाय-फाय सुविधा वापरता येते. उड्डाणात वाय-फायद्वारे इंटरनेटचा वेग जमिनीवर उपलब्ध असलेल्या वेगापेक्षा खूपच कमी असतो. विमानांमध्ये मोबाईल डेटा वापरण्यास मनाई असते. इतकेच नाही तर टेक-ऑफनंतर तुम्ही कोणालाही कॉल देखील करू शकत नाही. खरे तर, विमान आकाशात उडत असताना मोबाईल डेटा अनेक समस्या निर्माण करतो. संशोधनातून असे दिसून आले आहे, की यामुळे विमानाच्या नेव्हिगेशन सिस्टीम, रडार इत्यादींमध्ये समस्या निर्माण होऊ शकतात. त्याच वेळी, पायलटच्या हेडसेटमध्ये समस्या असू शकते आणि तो योग्यरित्या संवाद साधू शकत नाही. यामुळे अपघाताची भीती निर्माण होते.

# १० वर्षांपासून रस्ते, पाणी व ड्रेनेज या मूलभूत नागरी सुविधांचा तुटवडा, समस्यांकडे महापालिकेचे दुर्लक्ष, आयुक्तांच्या दालनात आंदोलन करणार

### कारवाई न झाल्यास निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा केडगाव मधील नागरिकांचा इशारा

नगर – मागील १० वर्षांपासून केडगाव देवी रोड परिसरातील अथर्वनगर, ठुबे मळा येथील नागरिकांना रस्ता, पाणी व ड्रेनेज या मूलभूत नागरी सुविधांचा तुटवडा भासत आहे. अनेक निवेदने देऊनही समस्या कायम असल्यामुळे संतप्त नागरिकांनी ३० सप्टेंबर रोजी महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना भेटून तातडीने उपाययोजना करण्याचे निवेदन दिले.

महापालिकेचे कर नियमित भरूनही नागरिकांना सुविधा नाकारल्या जात असल्याने संतप्त नागरिकांनी ८ दिवसांत कारवाई न झाल्यास आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. तसेच प्रश्न न सुटल्यास सर्व नागरिक महापालिका निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचेही स्पष्ट केले. यावेळी दिलीप दुधवणे, अविका पुंडे, मकरंद जोशी, विठ्ठल गारुडकर, शेषराव तांबडे, सोनवणे, मेजर सुरेश आंधळे, सतीश सूर्यवंशी, नितीन घोडके, तेजस बिचकर, भुजबळ मामा, समीर कुलकर्णी, दत्ता कुलकर्णी, ओंकार तागडे, ऋग्वेद दंडवते, दिलीप भोसले, संदीप मराठे, ताराचंद केवट, बाजीराम गर्जे, अनिकेत साळी, विजय बडवे, मंजुषा पाठक, मनिषा तांबोळी, सोनाली कुलकर्णी, अबोली जोशी, वैशाली पुंडे, घोडके, दूधवणे, उषा तांबडे, गर्जे, पद्मा तांबे, प्रिती दंडवते, प्रमिला कानफाडे, कविता बिचकर, भागडे, रेखा पावसे आदी महिला उपस्थित होत्या.



केडगाव देवी रोड परिसरातील अथर्वनगर, ठुबे मळा येथील रस्ता, पाणी व ड्रेनेज या मूलभूत नागरी समस्या कायम असल्यामुळे संतप्त नागरिकांनी महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना निवेदन दिले.

निवेदनात नमूद केल्या प्रमाणे, अथर्वनगर वसाहतीची स्थापना २००९–२०१० साली झाली असून सध्या येथे दीडशे ते दोनशे कुटुंब राहतात. परंतु, वसाहतीत ना व्यवस्थित रस्ता, ना ड्रेनेज लाईन आणि ना योग्य पाणीपुरवठा असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत.

या भागात ड्रेनेज लाईन नसल्यामुळे घरांचे सांडपाणी व पावसाचे पाणी साचून डबके तयार होत आहेत. या ठिकाणी डास, दुर्गंधी व अस्वच्छता वाढून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पर्यायी निचऱ्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने परिसरात दूषित वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या पाणीपुरवठ्यासाठी दोन ते अडीच इंची जुनी लाईन वापरली जात आहे. त्यामुळे नागरिकांना पाणी कमी दाबाने मिळते. वसाहतीत वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता पाणीपुरवठा अपुरा पडतोय. त्यामुळे नागरिकांनी ४ इंची नवी लाईन तातडीने टाकून देण्याची मागणी केली आहे. या भागातील रस्ता दोन वेळा मंजूर झाला असूनदेखील स्थानिक दोन व्यक्तींच्या वादामुळे रस्त्याचे काम रखडले आहे. यामुळे नागरिकांना दररोज चिखल, खड्यांनी भरलेल्या व धुळीच्या रस्त्यावरून प्रवास करावा लागत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# केडगाव उपनगरात कचऱ्याचा प्रश्न गंभीर; रस्त्यावर ढीग, सर्वत्र दुर्गंधी, आरोग्य धोक्यात

### प्रश्न तातडीने मार्गी लावा : मनपा आयुक्तांना मनोज कोतकर यांचे निवेदन

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या केडगाव उपनगरामध्ये गेल्या काही महिन्यांपासून कचरा संकलनासाठीची घंटागाडी सेवा बंद झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग साचले असून सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून साथीचे आजार पसरण्याची शक्यता वाढली आहे. दरम्यान, नवरात्रोत्सवाचे दिवस सुरू असून केडगाव देवीचे दर्शन घेण्यासाठी नगर जिल्ह्यातून तसेच राज्याच्या विविध भागातून भाविक मोठ्या संख्येने येत आहेत. भाविकांची गर्दी लक्षात घेता परिसरात तात्पुरते स्टॉल्स, खाद्यपदार्थ विक्रीची ठिकाणे आणि विविध दुकाने उभारण्यात आलेली आहेत. परिणामी, प्लास्टिक, उरलेले अन्न, पेपर प्लेटस्, कप इत्यादी कचरा प्रचंड प्रमाणात साचत आहे. हा कचरा योग्य पद्धतीने संकलित न झाल्याने व त्यावर पावसाचे पाणी पडल्यामुळे दुर्गंधीने वातावरण दूषित झाले आहे. स्थानिक नागरिकांना दररोज आपल्या घरातील कचरा टाकण्यासाठी योग्य व्यवस्था उपलब्ध नसल्याने ते सरळ रस्त्यावर कचरा टाकण्यास भाग पडत आहेत. यामुळे रस्त्यांवरून जाणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. शाळकरी मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वसामान्य नागरिकांना या दुर्गंधीमुळे श्वसनाचे आजार, ताप, मलेरिया, डेंग्यू, गॅस्ट्रो यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. याबाबत स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन सादर केले.



केडगाव उपनगरात कचऱ्याचा प्रश्न गंभीर सोडविण्याबाबत आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना मनोज कोतकर. (छाया : लहू दळवी)

निवेदनात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, कचरा व्यवस्थापनासंबंधी मनपा प्रशासन अपयशी ठरत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करण्याचा प्रकार चालू आहे. केडगावसारख्या महत्वाच्या आणि धार्मिकदृष्ट्या संवेदनशील भागात अशी परिस्थिती अस्वीकार्य आहे. त्यामुळे तातडीने घरोघरी दररोज घंटागाडी सेवा सुरू करून नागरिकांना दिलासा द्यावा. अन्यथा नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नावर आम्हाला कठोर भूमिका घ्यावी लागेल.

या निवेदनावर प्रतिक्रिया देताना मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की केडगाव उपनगरात कचरा संकलनाची अडचण निर्माण झाली आहे हे खरे असले तरी या समस्येवर तातडीने उपाययोजना केली जाणार आहे. पुढील १५ दिवसांत नवीन ठेकेदार नेमण्यात येणार असून नियमित कचरा संकलन पुन्हा सुरू केले जाईल. नागरिकांच्या घराघरात दररोज घंटागाडी सेवा पोहोचेल. नवरात्र व आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. असे ते म्हणाले.

मनोज कोतकर यांची अपेक्षा आहे की, फक्त आश्वासने न देता प्रत्यक्षात लवकरात लवकर घंटागाडी सुरू व्हावी, कचऱ्याचे ढीग तातडीने हटवावेत आणि केडगाव उपनगरातील स्वच्छता कायमस्वरूपी राखण्यासाठी ठोस धोरण राबवावे.

# नदीतील अतिक्रमणामुळे पाणी नागरिकांच्या घरात, राजकारणी, व्यापाऱ्यांची अतिक्रमणे तातडीने काढा

### आमदार संग्राम जगताप यांची निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील काही राजकारणी, व्यापाऱ्यांनी नदीमध्ये अतिक्रमण केले आहे. कालच्या पावसा मध्ये अतिक्रमणामुळे नदीच्या पाण्याचा प्रवाह रोखला गेला, त्यामुळे शहरातील बयाच भागात नदीचे पाणी घरांमध्ये घुसले. त्यामुळे लोकांचे अतोनात हाल झाले असुन काही जिवितहानी घडली असती तर त्याला जबाबदार कोण? काही मोजक्या लोकांनी प्रशासनाला हाताशी धरुन नदीमध्ये मोठया प्रमाणात अतिक्रमण केले आहे. तसेच उच्च न्यायालयाची दिशाभुल करुन काही राजकीय, व्यापाऱ्यांनी अतिक्रमण मोहिमेला उच्च न्यायालयाची स्थगिती मिळवली त्याबाबत आपण पुढाकार घेऊन उच्च न्यायालयाला सत्य परिस्थिती अवगत करणे गरजेचे आहे, असे आमदार संग्राम जगताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



नदीत करण्यात आलेली राजकारणी, व्यापाऱ्यांची अतिक्रमणे तातडीने काढावीत अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना देताना आ. संग्राम जगताप. (छाया : लहू दळवी)

अतिक्रमण, रुंदीकरण, खोलीकरण याबाबत अधिवेशनामध्ये प्रश्न विचारला असता तात्कालीन महसूल मंत्री एकनाथ खडसे यांनी जिल्हाधिकारी यांना तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सिना नदीची हद्द निश्चिती झाली, अतिक्रमण मोहीम सुरू झाली असता काही राजकीय, व्यापाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून स्थगिती मिळवली. या याचिकेविरोधात सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडून पूर परिस्थिती माहिती द्यावी व तातडीने अतिक्रमण काढावे असे आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी यांना आमदार संग्राम जगताप यांनी दिले.

# शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी प्रशांत शिंदे तर उपाध्यक्षपदी ईश्वर शिंदे



नगर – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारगाव भातोडी शालेय व्यवस्थापन समिती व शालेय समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड प्रक्रिया खेळीमळीच्या वातावरणात पार पडली. शालेय समिती अध्यक्षपदी प्रशांत बाबासाहेब शिंदे, उपाध्यक्षपदी ईश्वर विठ्ठल शिंदे तसेच समिती सदस्यपदी कविता महेश गुंड, अतुल रामदास शिंदे, शुभांगी दत्तात्रय गुंड, मनिषा गोरख जाधव, छाया गणेश उमाप, सुवर्णा शिंदे यांची निवड झाली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ढोकळे सर, महांडुळे सर, सौ.सविता सचिन शिंदे, विक्रम शिंदे, निलेश शिंदे, अजित शिंदे, विशाल शिंदे, सचिन उमाप, अमोल शिंदे, असिफ शेख, सागर चंद्रकांत शिंदे, सचिन पंढरीनाथ शिंदे पालक उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व शालेय समिती सदस्यांचे महाराष्ट्र राज्य कृषी परिषदेचे संचालक गणेश शिंदे, पारगाव भातोडी च्या प्रथम लोकनियुक्त सरपंच मीनाक्षी संतोष शिंदे, माजी उपसरपंच सुरेश भोसले, शालेय शिक्षण समितीच्या माजी अध्यक्षा श्वेता रमेश गुंड, पारगाव भातोडी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन साहेबराव गुंड, व्हा.चेअरमन मधुकर शिंदे, माजी पंचायत समिती सदस्य संजय जगताप, ग्रा.सदस्य छोटुभाई शेख, माजी उपसरपंच दत्तात्रेय तनपुरे, माजी चेअरमन अशोक लक्ष्मण शिंदे, माजी चेअरमन गोविंद गुंड यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# युरॉलॉजी एम सी एच सुपरस्पेशॉलिटी परीक्षेत नगरचे डॉ. स्वनित देशपांडे महाराष्ट्रात प्रथम



नगर – देशपांडे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, आनंदी बाजार येथील युरॉलॉजीस्ट (मूत्र विकार तज्ज्ञ) डॉ. स्वनित देशपांडे यांनी एम सी एच युरॉलॉजी सुपरस्पेशालिटी पदवी परीक्षा २०२५ मध्ये महाराष्ट्रात सर्वप्रथम क्रमांक मिळवत उत्तीर्ण केली.

त्यांनी सुपरस्पेशालिटीचा अभ्यासक्रम मुंबईतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक सायन हॉस्पिटल येथे पूर्ण केला. त्यांनी एम बी बी एस पदवी मुंबईतील के ई एम हॉस्पिटल (प्रवेश परीक्षेत महाराष्ट्रात १० वा क्रमांक), तसेच एम एस जनरल सर्जरी हि पदवी मुंबईतील नायर रुग्णालयातून प्रथम क्रमांकाने आणि विशेष प्रावीण्याने मिळवली. २०२४ मध्ये एडीनबर्ग, युनाइटेड किंग्डम मधील रॉयल कॉलेज ऑफ इंग्लंड ची एम आर सी एस हि पदवी त्यांनी प्राप्त केली. तसेच AIIMS सुपरस्पेसिलीटी प्रवेश परीक्षेत त्यांनी भारतात ९ व क्रमांक मिळवला.

या उल्लेखनीय कामगिरी मुळे त्यांना युरॉलॉजिकल असोसिएशन ऑफ इंडिया तर्फे त्यांना आंतरराष्ट्रीय प्रवासी शिष्यवृत्ती मिळाली. त्यांना २०२५ च्या नेवाडा मधील अमेरिकन युरॉलॉजिकल असोसिएशन परिषदेत त्यांना भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

त्यानंतर युरॉलॉजीसाठी जगात प्रसिद्ध असणाऱ्या युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया सॅन डिएगो येथे त्यांनी फिमेल युरॉलॉजिमध्ये ऑबसेर्व्हरशीप केली. येथे त्यांनी स्त्रियांच्या रजोनिवृत्ती नंतर नकळत लघवी होण्याच्या जटिल समस्यांवरील अत्याधुनिक शस्त्रक्रिया, रोबोटिक सर्जरी सारख्या अत्याधुनिक शस्त्रक्रिया–तंत्रज्ञच अभ्यास केला.

तसेच जगप्रसिद्ध सेक्शुअल मेडिसिन तज्ज्ञ डॉ. अर्विन गोल्डस्टीन यांच्या मार्गदर्शनाखाली विविध लैंगिक समस्यावरील शास्त्रोक्त उपचार आणि शस्त्रक्रियांचा त्यांनी अभ्यास केला. त्यानंतर ट्यूसॉन, ऍरिझोना येथे प्रोस्टेट ग्रंथीच्या सर्व दुर्बिणीच्या शस्त्रक्रिया आद्ययावत लेसर तंत्रज्ञानाने करण्याचा अभ्यास त्यांनी केला. त्यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल 'सर्वोत्कृष्ट निवासी डॉक्टर' हा पुरस्कार सायन हॉस्पिटल तर्फे देण्यात आला. डॉ. स्वनित देशपांडे हे नगर मधील लॅपरोस्कोपिक सर्जन डॉ. हेमंत देशपांडे आणि स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रीती देशपांडे यांचे चिरंजीव आहेत.

# नगरपरिषदा व नगरपंचायती निवडणुकांसाठी मतदारयादी कार्यक्रम जाहीर

### ८ ऑक्टोबरला प्रारूप यादी जाहीर होणार

मुंबई – राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २८९ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (२४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती) सार्वत्रिक निवडणुकांसाठी अस्तित्वातील विधानसभा मतदारयादीचा वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. या यादीनुसार प्रभागनिहाय मतदारांचे विभाजन करण्याची कार्यवाही तात्काळ सुरू करण्यात यावी, असे आयोगाने म्हंटले आहे.

आयोगाने मतदारयादीचा तपशीलवार कार्यक्रम जाहीर केला असून, तो पुढील प्रमाणे आहे – प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करणे – ८ ऑक्टोबर, प्रारूप यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी ८ ते १३ ऑक्टोबर, अंतिम प्रभागनिहाय मतदारयादी अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करणे २८ ऑक्टोबर, मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध करणे ७ नोव्हेंबर

प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादी तयार करण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांना विधानसभेच्या मतदारयादीचा विचार करून विभाजन करण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी आयोगाने विकसित केलेल्या नवीन संकेतस्थळ https://mabasecvoterlist.in चा वापर करावा. जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक विधानसभा मतदारसंघाची यादी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून मिळवावी. नगरपरिषदा/नगरपंचायतींना आधीच यूजर आयडी व पासवर्ड उपलब्ध करून देण्यात आले असून, त्यानुसार Election ssembly Master, Ward Master अपलोड करावे. कंट्रोल चार्ट तयार करून त्याची खात्री करावी आणि संगणक प्रणालीद्वारे PDF स्वरूपात मतदारयादी तयार करावी. असे आयोगाने या आदेशात म्हंटले आहे.

# धूर सोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करा

नगर – ज्या वाहनांचा भयंकर धूर उघड्या डोळ्यांनी स्पष्टपणे दिसतो अशा वाहनांवर मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ईमेल द्वारे पाठविलेल्या निवेदनात ललवाणी यांनी म्हटले आहे की, अहिल्यानगर जिल्ह्यात व शहरात भयंकर धूर सोडणारी वाहने रस्त्यावर चालताना दिसत आहेत. त्यामुळे वायू प्रदूषण होऊन पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. त्यामुळे अशा वाहनांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. निवेदनाची प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी राज्याचे परिवहन आयुक्त यांना देखील ईमेलद्वारे पाठविण्यात आली आहे.

# ३ ते १० ऑक्टोबर दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यातील साहित्यिक रत्न ग्रंथ प्रदर्शन

नगर – जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर मराठी भाषा समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषेसंदर्भातील जास्तीत जास्त संशोधन संवर्धन व जनजागृती व्हावी या उद्देशाने ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस व ३ ते १० ऑक्टोबर दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यातील साहित्यिक रत्न ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन प्रभारी ग्रंथालय संचालक यांनी केले आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, त्रिवेणी, पंपीग स्टेशन रोड, महालक्ष्मी उद्यानाजवळ, भुतकरवाडी, सावेडी, अहिल्यानगर येथे आयोजित प्रदर्शनात अहिल्यानगर जिल्ह्यातील साहित्यिकांचे ग्रंथ, वृत्तपत्रातील लेख तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेले ग्रंथ नागरिकांना पहावयास, हाताळण्या व वाचाण्यास मिळणार आहे. ३ ते १० ऑक्टोबर या कालावधीत शासकीय सुट्या वगळुन सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत सर्वांसाठी विनामुल्य खुले राहणार आहे.

# नेप्ती सेवा सोसायटीच्या संचालकपदी अंबादास जपकर यांची बिनविरोध निवड

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती सेवा सोसायटीच्या रिक्त संचालकपदी अंबादास दशरथ जपकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सोसायटीचे तत्कालीन संचालक कै. दशरथ तुकाराम जपकर यांच्या निधनानंतर ही जागा रिक्त झाली होती. त्यांचे चिरंजीव अंबादास जपकर यांची संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेसाठी मंदाकिनी ठोकळ यांनी निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. चेअरमन सुरेंद्र होळकर यांनी अंबादास जपकर यांचे नाव सुचविले तर जालिंदर शिंदे यांनी अनुमोदन दिले. कुणीही विरोध न केल्याने जपकर यांची निवड बिनविरोध जाहीर करण्यात आली.



तालुक्यातील नेप्ती सेवा सोसायटीच्या रिक्त संचालकपदी अंबादास दशरथ जपकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यावेळी ग्रामस्थ व सोसायटीच्या संचालक मंडळाच्या वतीने अंबादास जपकर यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ग्रामस्थ व सोसायटीच्या संचालक मंडळाच्या वतीने अंबादास जपकर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी सरपंच विठ्ठलराव जपकर, माजी सरपंच संजय आसाराम जपकर, माजी पंचायत समिती सदस्य देवा होले, शिवाजी होळकर, नितीन कदम, मार्केट कमिटी सदस्य वसंत पवार, सरपंच अशोक जपकर, माजी सरपंच दिलीपराव होळकर, उपसरपंच एकनाथ आसाराम जपकर, रामदास फुले, माजी उपसरपंच दादू चौगुले, बंडू जपकर, संभाजी गडाख, फारुक सय्यद, बाबासाहेब होळकर, सेवा सोसायटीचे चेअरमन सुरेंद्र होळकर, व्हाईस चेअरमन सादिक पवार, संचालक मच्छिंद्र होळकर, विलास जपकर, दादाभाऊ होळकर, अशोक जपकर, राजाराम जपकर, राजेंद्र जपकर, जालिंदर शिंदे, उमर सय्यद, मुक्ता कांडेकर, रोहिणी होळकर, जमीर सय्यद, सुरेश कदम, मल्हारी कांडेकर, भाऊसाहेब होळकर, बापू जपकर, अशोक जपकर, भास्कर जपकर, शांताबाई जपकर, अतुल जपकर, सुभाष जपकर, गोरख जपकर, रामदास जपकर, भीमराज जपकर, सोसायटीचे सचिव भाऊसाहेब कुंठाळे, माजी चेअरमन भास्कर जपकर, नंदकुमार जपकर, राजेंद्र चत्तर, बाजीराव चत्तर, विजय जपकर, कचरू जपकर, अजय जपकर, ज्ञानेश्वर जपकर, नंदू जाधव, सोमनाथ जपकर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अशोक सावळेराम जपकर यांचाही सत्कार करण्यात आला.

# आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन

## अनुभवी पिढीचा सन्मान आणि मानवी मूल्यांची जपणूक

मानवी जीवन हा एक अखंड प्रवास आहे. या प्रवासाला बाल्य, तरुणपण, प्रौढत्व आणि वार्धक्य अशी टप्प्यांची शृंखला लाभते. मानवी जीवनाची घडी या चार प्रमुख टप्प्यांभोवती फिरते असते या प्रत्येक टप्प्यात जीवन नवे अनुभव, नवे प्रश्न, नवे उत्तर घेऊन समोर येते. प्रत्येक टप्पा आपल्याला काही ना काही देतो, शिकवतो. बाल्य निरागसतेने भारलेले असते, तरुणपण उत्साहाने आणि धाडसाने झळाळते, प्रौढत्व जबाबदारीच्या जाणिवेने सजते आणि वार्धक्य आयुष्याचा परिपक्व अनुभव घेऊन येते. वार्धक्य हा टप्पा अनेकदा दुर्बलतेशी, आजारपणाशी, असहाय्यतेशी जोडला जातो; वार्धक्य हा जीवनाचा शेवटचा टप्पा असला तरी पण प्रत्यक्षात तो आयुष्यभर साठवलेल्या ज्ञानाचा, परंपरांचा, संस्कारांचा आणि संघर्षांचा खजिना आहे. या अनमोल खजिन्याचे महत्त्व समाजाला सतत पटवून देण्यासाठी व वृद्धांचा सन्मान करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन (International Day for Older Persons) म्हणून जाहीर केला.

१९९० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने या दिनाची घोषणा केली आणि १९९१ पासून जगभरात त्याचे औपचारिक पालन सुरू झाले. या उपक्रमामागील हेतू केवळ एका दिवसापुरता वृद्धांना अभिवादन करणे, शुभेच्छा देणे नाही, तर त्यांचे हक्क, त्यांचे आरोग्य, त्यांची सामाजिक व आर्थिक सुरक्षा आणि त्यांचा सन्मान याबाबत सातत्याने जागरूकता निर्माण करणे हा आहे. दरवर्षी या दिवसाला एक संकल्पना वा घोषवाक्य दिले जाते. ज्यामधून वृद्धकल्याणाच्या एखाद्या महत्त्वाच्या पैलूवर लक्ष केंद्रीत केले जाते. कधी ''Leaving No One Behind " तर कधी ''Resilience of Older Persons in a Changing World'' अशा संकल्पना वृद्धांच्या प्रश्नांवर आणि समाजातील त्यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकतात. "Leaving No One Behind' ही संकल्पना काही वर्षांपूर्वी देण्यात आली होती. या वाक्याचा गाभा असा की, समाजातील कोणताही घटक मागे राहू नये; विशेषतः वृद्ध व्यक्तींना प्रगतीच्या प्रवाहात सहभागी करून घेतले जावे. तर ''Resilience of Older Persons in a Changing World" या वाक्याचा गाभा असा की, बदलत्या जगात वृद्ध व्यक्तींची लवचिकता असायला पाहिजे.

भारतीय समाजरचनेत प्राचीन काळापासून वृद्धांना मानाचे स्थान आहे. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव' या वाक्यांतून वृद्धांचा सन्मान किती खोलवर रुजला आहे हे दिसून येते. गुरू, आई-वडील, आजी-आजोबा हे घरातील आधारस्तंभ मानले गेले. त्यांच्या आशीर्वादाशिवाय जीवनातील कार्य अपूर्ण समजले जात होते. परंपरा, संस्कार, अनुभव आणि मार्गदर्शन यांचा खरा वारसा हीच वृद्ध पिढी पुढील पिढ्यांना देत आली आहे. परंतु आधुनिकतेच्या, औद्योगिकीकरणाच्या आणि शहरीकरणाच्या वादळाने कुटुंबव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवले. संयुक्त कुटुंब व्यवस्थेत तर वृद्ध हे केंद्रबिंदू होते. त्यांचे अनुभव, त्यांची निर्णयक्षमता व शहाणपण यामुळे घरातील तणाव मिटत असे. संयुक्त कुटुंब पद्धती मोडून विभक्तकुटुंब पद्धती रुजली जात आहे. तसेच शहरीकरण, स्थलांतर, नोकरी-व्यवसायाच्या धकाधकीमुळे वृद्धांचे स्थान काहीसे दुय्यम झाले आहे. आज अनेक वृद्धांना मुलांपासून दूर राहावे लागत असून त्यामुळे वृद्धाश्रमांची संख्या वाढत चालली आहे. काही वृद्धांना आपल्या घरातच उपेक्षा, एकाकीपणा, निराधारपण आणि असहाय्यतेचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन आपल्याला आत्मपरीक्षणास भाग पाडतो.

वार्धक्यातील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे आरोग्य होय. शरीराची झीज अपरिहार्य असते. वय वाढत जाताना शरीरात अनेक विकार निर्माण होतात. वाढते वय मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, संधिवात, कर्करोग, स्मृतिभ्रंश, दृष्टी व श्रवणदोष यांसारख्या आजारांना आमंत्रण देते. वैद्यकीय उपचारांची महागाई आणि आरोग्य व्यवस्थेतील कमतरता यामुळे वृद्धांना योग्य उपचार मिळत नाहीत. विशेषतः ग्रामीण भागात आरोग्य सुविधा अपुऱ्या आहेत. शासनाने जेष्ठ नागरिकांसाठी विमा योजना, आरोग्य कार्ड योजना सुरू केल्या असल्या तरी प्रत्यक्ष लाभ प्रत्येक गरजू वृद्धापर्यंत पोहोचत नाही. केवळ शारीरिक आरोग्य नव्हे, तर त्याहूनही महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मानसिक आरोग्य होय. मानसिक आरोग्य हीसुद्धा वृद्धांमधील एक गंभीर समस्या आहे. मुलांपासून दूर राहणे, एकटेपणा, संवादाचा अभाव, सामाजिक उपेक्षा, आत्मीयतेचा तुटवडा यामुळे अनेक वृद्ध नैराश्याने ग्रस्त होतात. काही वेळा हे नैराश्य इतके तीव्र होते की आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जातात. म्हणूनच कुटुंबीयांनी वृद्धांसाठी वेळ देणे, त्यांच्या मनातील भावना ऐकून घेणे, संवाद साधणे हे महत्त्वाचे ठरते.

आरोग्यानंतरचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वृद्धांची सामाजिक आणि आर्थिक सुरक्षितता होय. कामकाज संपल्यावर उत्पन्नाचे साधन थांबते, उत्पन्नाचे स्रोत बंद होतात. पेन्शन, बचत, नोकरीतील ग्रॅच्युइटी, मुलांचा आधार किंवा समाजाची मदत यावर वृद्धांचे जीवन अवलंबून राहते. परंतु सर्वांनाच पेन्शन किंवा आर्थिक आधार मिळतो असे नाही. तर अनेक वृद्ध दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात. अशावेळी शासनाच्या ठोस सामाजिक सुरक्षा योजना, अनुदाने, पेन्शन योजना या अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. मोफत प्रवास, सवलतीच्या आरोग्य सेवा, वयोवृद्धांना प्राधान्य, अशा सोयी सुविधा केवळ औपचारिक राहू नयेत, तर प्रत्यक्षात त्यांचा लाभ मिळावा. परंतु त्याचा लाभ मिळवण्यासाठी लागणारी कागदपत्रे, अर्ज, प्रक्रियांचा अडथळा हे सर्व वृद्धांसाठी त्रासदायक ठरते. म्हणूनच सोपी आणि सुलभ प्रक्रिया करून या योजनांचा लाभ प्रत्येक वृद्धापर्यंत पोहोचवणे हे शासनाचे कर्तव्य आहे.

वृद्धांचा सन्मान करणे म्हणजे फक्त औपचारिक आदर व्यक्त करणे नाही. तर त्यांच्या अनुभवाला, कौशल्याला आणि शहाणपणाला समाजात स्थान देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक वृद्धांकडे अपार अनुभवसंपदा आहे. त्यांच्या संघर्षकथांमधून तरुणांना प्रेरणा मिळू शकते. लहान मुलांना आजोबा-आजींच्या गोष्टींमधून संस्कार मिळतात. शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था, स्वयंसेवी संस्था, तरुण उद्योजक यांनी वृद्धांच्या अनुभवाचा उपयोग विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी करायला हवा. निवृत्त व्यक्तींना अध्यापन, मार्गदर्शन, स्वयंसेवा यामध्ये सामावून घेतले, तर त्यांना आयुष्याचा नवा अर्थ मिळू शकेल. निवृत्ती ही जीवनातील शेवट नसून नव्या संधींचा आरंभ असू शकतो. शिक्षक, शेतकरी, कारागीर, अधिकारी, व्यापारी अशा विविध क्षेत्रांत अनुभव मिळवलेले वृद्ध समाजासाठी अजूनही उपयुक्त ठरू शकतात.

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे वृद्ध बहुधा मागे पडतात. मोबाईल ॲप्स, ऑनलाइन बँकिंग, आरक्षण, डिजिटल पेमेंट, आरोग्य नोंदी यांची माहिती त्यांना कठीण जाते. यामुळे त्यांना असुरक्षिततेची भावना निर्माण होते. म्हणूनच डिजिटल साक्षरता हा आजच्या काळाचा अत्यंत आवश्यक भाग आहे. त्यामुळे त्यांना डिजिटल साक्षरता देणे गरजेचे आहे. तरुण पिढीने धीराने वृद्धांना शिकवले, मार्गदर्शन केले, मदत केली, तर त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि त्यांचे जीवन अधिक सोपे आणि आत्मनिर्भर होईल. वृद्धांच्या जीवनात कला, संस्कृती, अध्यात्म आणि छंद यांना महत्त्वाचे स्थान आहे. वाचन, लेखन, संगीत, चित्रकला, योगाभ्यास, प्रवास, बागकाम अशा छंदांमुळे त्यांचे जीवन आनंदी बनू शकते. समाजाने व शासनाने यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले पाहिजे. वृद्धांसाठी विशेष ग्रंथालये, उद्याने, व्यायामशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रवास योजना, पर्यटन योजना, सामाजिक मैत्री गट या माध्यमांतून त्यांना जीवनाचा नवा उत्साह मिळून त्यांचे जीवन अधिक रंगतदार होऊ शकते.

भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना समान हक्क दिले आहेत. वृद्धांना त्यांच्या वयानुसार सन्मान, सुरक्षा आणि सुविधा मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. भारत सरकारने २००७ मध्ये 'पालक व वरिष्ठ नागरिकांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम' लागू केला. या कायद्यानुसार वृद्धांना त्यांच्या मुलांकडून किंवा नातेवाईकांकडून पालनपोषणाची मागणी करता येते. तसेच शासनाने वृद्धांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. मात्र कायद्याची खरी अंमलबजावणी आणि योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे ही खरी जबाबदारी समाजावरच आहे. आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन आपल्याला मानवी मूल्यांची आठवण करून देतो. वृद्धांचा सन्मान म्हणजे फक्त नमस्कार करणे नाही; तर त्यांच्या भावना समजून घेणे, त्यांच्या गरजा पूर्ण करणे, त्यांच्या आयुष्यात अर्थपूर्ण सहभाग निर्माण करणे, हेच खरे उद्दिष्ट आहे. आपण वृद्ध झाल्यावर आपल्याला जसा सन्मान आणि आधार अपेक्षित असेल, तसाच आजच्या वृद्धांना द्यावा, ही खरी संस्कृती आहे. कधी कधी तरुण पिढी वृद्धांच्या विचारांना 'जुने' म्हणून नाकारते. पण हे विसरणे चुकीचे ठरेल की आजच्या प्रगतीचा पाया ह्याच वृद्धांच्या कष्टांवर, त्यागावर आणि संघर्षावर रचला आहे. त्यांच्या घामामुळे उभे राहिलेले शेत, कारखाने, शाळा, संस्था आज समाजाला लाभ देत आहेत. त्यामुळे त्यांचा सन्मान करणे हे केवळ कर्तव्य नव्हे तर आपली जबाबदारी आहे. आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन केवळ एक औपचारिक उत्सव म्हणून न पाहता तो आत्मपरीक्षणाचा दिवस म्हणून साजरा करायला हवा. आपण आपल्या घरातील, आपल्या समाजातील वृद्धांना किती सन्मान, किती आधार, किती प्रेम देतो याचा विचार करायला हवा.

वार्धक्य हे जीवनाचे ओझे नाही, तर ते आयुष्याच्या प्रवासाची एक सुंदर संध्याकाळ आहे. संध्याकाळ सुंदर व्हावी यासाठी सकाळपासून मेहनत घ्यावी लागते. जसा मावळता सूर्य आकाशाला लालिमा देऊन जातो, तशीच वृद्धांची उपस्थिती समाजाला शांततेचा, शहाणपणाचा आणि समाधानाचा संदेश देते. जशी सकाळ नवी ऊर्जा घेऊन येते, तसा वार्धक्याचा काळ अनुभवाचा, ज्ञानाचा आणि शांततेचा साठा घेऊन येतो. या संध्याकाळी जर कुटुंबाचे प्रेम, समाजाची साथ आणि शासनाची मदत मिळाली, तर जीवनाचा शेवटचा टप्पा सुवर्णमयी ठरू शकतो. आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन आपल्याला हीच प्रेरणा देतो की वृद्धांचा सन्मान करणे म्हणजे आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि मानवतेचा सन्मान करणे होय.

आजच्या या विशेष दिवशी आपण सर्वांनी अशी प्रतिज्ञा करूया की आपल्या आजूबाजूच्या प्रत्येक वृद्ध व्यक्तीला आपण आपुलकीचा स्पर्श देऊ, त्यांच्या अनुभवाला आदर देऊ, त्यांच्या जीवनातील संध्याकाळ अधिक सुखकर बनवण्यासाठी आपापल्या परीने योगदान देऊ. कारण वृद्ध हेच आपल्या अस्तित्वाचे मूळ आहेत; त्यांना सन्मान देणे म्हणजे आपल्या भविष्याच्या फुलोऱ्याला खतपाणीघालून भविष्याची पायाभरणी अधिक भक्कम करणे होय.



– **डॉ. राजेंद्र बगाटे**, (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक)



नाट्य अभिनेते आणि दलित महासंघाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष काशिनाथ सुलाखे पाटील यांना काशी हिंदी विश्वविद्यापीठ, बनारस यांच्या वतीने डी. लीट (विद्या वाचस्पती) डॉक्टरेट ही मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे.

## काशिनाथ सुलाखे पाटील यांना डी. लीट (डॉक्टरेट) पदवी प्रदान



नगर – नाट्य अभिनेते आणि दलित महासंघाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष काशिनाथ सुलाखे पाटील यांना काशी हिंदी विश्वविद्यापीठ, बनारस यांच्या वतीने डी. लीट (विद्या वाचस्पती) डॉक्टरेट ही मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे. अशी माहिती दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष संजय चांदणे यांनी दिली.

गेल्या ४० वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक आणि नाट्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त तसेच वंचित समाजघटकांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी अनेक आंदोलनं, उपोषणं आणि चळवळींच्या माध्यमातून अहोरात्र प्रयत्न केले आहेत. या योगदानाची दखल घेत काशी हिंदी विद्यापीठाने त्यांना गौरविले.

२८ सप्टेंबर रोजी जुहू इस्कॉन मंदिर, सांताक्रुझ (मुंबई) येथे झालेल्या कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलगुरू सुखमंगल सिंह 'मंगल' यांच्या हस्ते तसेच सिनेअभिनेते विवेक ओबेरॉय व आचार्य लोकेश मुनी (दिल्ली) यांच्या प्रमुख उपस्थितीत सुलाखे पाटील यांना डी. लीट (विद्या वाचस्पती) ही पदवी प्रदान करण्यात आली.

## अय्यप्पा मंदिरात २ ऑक्टोबरला दशहरा उत्सव



नगर – सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिरात नवरात्रउत्सवनिम्मित रोज धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जात असून २ ऑक्टोबर रोजी दसऱ्याला सकाळी ७.३० ला विद्यारंभ व ९ वा पुस्तक पूजन होणार आहे, अशी माहिती अयप्पा सेवा समितीचे अध्यक्ष के के शेट्टी यांनी दिली. नवरात्र उत्सवात रोज धार्मिक कार्यक्रम होत आहे तर भारतात फारच कमी ठिकाणी असणाऱ्या देवी सरस्वती मंदिर येथे आहे, येथे असणार्या सरस्वती मंदिरात रोज संध्याकाळी दीपआराधना, आरती व पुष्पाभिषेक करण्यात येत आहे.

तसेच दुर्गास्टमी निमीत भक्तीप्रिया ग्रुप श्री ललिता सहस्त्रनाम ाचा जप केला आहे. २ ऑक्टोबर ला विजयादशमीच्या मुहूर्तावर सकाळी ७.३० पासून विद्यारंभ कार्यक्रम होणार आहे. या उत्सवाच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर वतीने राहुरी येथे घेण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयातील विद्यार्थिनी सबा फलक मुश्ताक पठाण आणि महादजी शिंदे कनिष्ठ महाविद्यालय मधील विद्यार्थिनी क्रतु कैलास माने या दोघींची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

## सबा फलक मुश्ताक पठाण आणि क्रतु माने या दोघींची विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर वतीने राहुरी येथे लोकनेते रामदास धुमाळ महाविद्यालयात घेण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयातील विद्यार्थिनी सबा फलक मुश्ताक पठाण आणि महादजी शिंदे कनिष्ठ महाविद्यालय मधील विद्यार्थिनी क्रतु कैलास माने या दोघींची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. गेल्या महिन्यात महाराजा जीवाजीराव शिंदे महाविद्यालयात झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेत श्रीगोंदा येथील १० विद्यार्थिनीची जिल्हा स्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली होती. २७ सप्टेंबर रोजी राहुरी येथील जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत त्यांनी भाग घेतला यातील सबा फलक मुश्ताक पठाण आणि क्रतू कैलास माने यांनी सर्व फ `ऱ्यांमध्ये कौशल्य वापरून पॉइंट मिळवले. या स्पर्धेतून विभागीय स्तरावरील होणाऱ्या स्पर्धेसाठी ५ विद्यार्थिनींची निवड करण्यात आली यात श्रीगोंद्यातील वरील दोन विद्यार्थिनीची निवड झाली. त्यांना प्राचार्या वर्षा भोईटे आणि प्रशिक्षक विठ्ठल होले यांचे मार्गदर्शन लाभले. सबा फलक हि येथील पत्रकार मुश्ताक पठाण यांची मुलगी आहे.

## धनादेश न वटल्याच्या फौजदारी खटल्यात दंडाची व कैदेची शिक्षा

नगर – हात उसनवार रक्कम परतफेडीपोटी आरोपीने दिलेले दोन धनादेश न वटल्याच्या फौजदारी खटल्यात आरोपी धनजंय किसन आव्हाड (रा.सुडके मळा, अ.नगर) यांच्यावर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वयेचा आरोप सिध्द झाल्यामुळे अ.नगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी आरोपीस एन आय ॲक्ट कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यामध्ये दोषी धरून आरोपीस एक महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. आरोपीने दंडाची रक्कम रु.७५,००० फिर्यादीस एक महिन्याच्या आत द्यावी व दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीस तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

फिर्यादी वैभव अशोक भुतकर कडून आरोपी यांनी व्यवसाय वाढीसाठी रक्कम रुपये १,३०,००० हजार रुपये घेतलेले होते. सदरची रक्कम घेताना उसनवार पावती नोटरीदस्त करून दिली होती. रकमेच्या परतफेडीपोटी वरील आरोपी याने फिर्यादीस प्रत्येकी रु. ६५,००० रक्कम रुपयाचे दोन धनादेश दिलेले होते. सदरचे दोन्हीही धनादेश फिर्यादीने त्यांचे बँके खात्यात जमा केला असता आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे दोन्हीही धनादेश न वटता परत आले, त्यामुळे फिर्यादीने आरोपीला ॲड. सचिनदेवा पाठक यांच्या मार्फत नोटीस पाठवून धनादेश वटले नाही बाबत कळवले. आरोपीनी नोटीस स्विकारूनही फिर्यादीस रक्कम न दिल्यामुळे अ.नगर येथील न्यायालयात वरील कायद्यानुसार दोन फौजदारी खटले दाखल केलेले होते. या दोन्हीही फौजदारी खटल्यात आरोपीस वरीलप्रमाणे शिक्षा केली आहे. फिर्यादीतर्फे ॲड. सचिन पाठक यांनी काम पाहीले.




पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्यावतीने मागील वर्षी झालेल्या निबंध स्पर्धेचे पतसंस्थेच्या वार्षिक सभे प्रसंगी पारितोषिक वितरण करण्यात आले.

## पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेच्या निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

नगर – पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्यावतीने मागील वर्षी झालेल्या निबंध स्पर्धेचे पतसंस्थेच्या वार्षिक सभे प्रसंगी पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी पतसंस्थेचे संस्थापक, चेअरमन वसंत लोढा, व्हाईस चेअरमन सुधीर पगारिया, मानद सचिव विकास पाथरकर, ज्येष्ठ संचालक मिलिंद गंधे, संचालक शैलेश चंदे, निलेश लोढा, श्रीमती शैला चंगेडे, संचालिका शारदा होशिंग, सुभाष फणसे, बाबासाहेब साठे, व्यवस्थापक निलेश लाटे, उपव्यवस्थापक सुखदेव दरेकर आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे विजेते शालेय गट (नववी ते बारावी) प्रथम क्रमांक – आशुतोष भागवत, महाविद्यालयीन गट., प्रथम क्रमांक– निकीता देशमुख, द्वितीय क्रमांक –चैतन्य खांदाट, तृतिय क्रमांक –मनोज शिंदे, खुला गट., प्रथम क्रमांक – हरिश्चंद्र धिगळे, द्वितीय क्रमांक – मनाली नागुल, तृतीय क्रमांक –अमिता अकोलकर यांना पारितोषिके देण्यात आली.

प्रथम क्रमांक रोख पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते.



### ए एम सेरेनिया अपार्टमेंटच्या वतीने पूरग्रस्तांसाठी एक लाख ५२ हजार १११ रुपयाचा धनादेश

पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला पाईपलाईन रोड येथील ए एम सेरेनिया अपार्टमेंटच्या वतीने एक लाख ५२ हजार १११ रुपयाचा धनादेश जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्त करताना आमदार संग्राम जगताप. समवेत प्रितेश शहा, राजेश गुगळे, सचिन ओस्तवाल, सुदीप अग्रवाल, रमेश जाधव, दिलीप दाते, साहिल ओस्तवाल, बाळासाहेब शेटे, प्रताप काळे, दीपक देशमुख आदी उपस्थित होते. (छाया : लहू दळवी)

## दसऱ्यानिमित्त २ ऑक्टोबरला रोजगार व कार्यकर्ता मेळावा

### उपमुख्यमंत्री अजित पवार येणार

नगर – आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका व नगर पंचायतीच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील महायुतील घटकपक्षांचा एकत्रित रोजगार व कार्यकर्ता मेळाव्याचे २ ऑक्टोबर दसऱ्याच्या दिवशी पारनेर शहरातील हिंद चौकात दुपारी १ वाजता पारनेर येथे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या प्रमुख उपस्थितीत व आ.काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत व जिल्हा कार्यालयीन सचिव साईनाथ भगत यांनी दिली.

मेळाव्याचे निमंत्रक पारनेर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजय औटी म्हणाले, महायुतील घटकपक्ष भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट), शिवसेना (शिंदे गट) व आरपीआय या पक्षांचा सहभाग असलेल्या या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सुजय विखे व आ.संग्राम जगताप उपस्थित राहणार आहेत. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, भाजपा दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग, शिवसेना जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, आरपीआय (आठवले गट) जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, राष्ट्रवादी काँग्रेस युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे व महिला जिल्हाध्यक्षा अशा निंबाळकर आदी मेळाव्याच्या उपस्थित राहणार आहेत. तसेच मेळाव्याच्या प्रमुख उपस्थित म्हणून भाजपा जिल्हा सरचिटणीस विश्वनाथ कोरडे, पारनेर भाजपा अध्यक्ष राहुल शिंदे, जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अश्विनी थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष कार्याध्यक्षा सुधामताई कवाद, दूध संघाचे चेअरमन संदीप ठुबे व खरेदी विक्री संघाचे चेअरमन दत्तात्रय रोकडे उपस्थित राहणार आहेत.

या जिल्हा मेळाव्यास महायुतीतील घटक पक्षांच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विक्रमसिंह कळमकर, सचिन डेरे, अशोक चोभे, भास्कर उचाळे, सुषमा रावडे, सोनाबाई चौधरी, पंकज कारखिले, शिवाजी खिलारी, किसन शिंदे, राजीव उबाळे, अपर्णा खामकर व अजिंक्यतारा देवकर आदींनी केले आहे.

Wish You All Happy Dussehra

Upto 20% OFF Dussehra Festival

फेस्टीवलसाठी भरपूर व्हॅरायटी

बंगला असो किंवा ऑफिस, शोरुम असो किंवा फॅक्टरी फर्निचर्स जगात एक विश्वसनीय नाव

हरीष स्टील फर्निचर

डायनिंग सेट | कपाट | सोफासेट | डबल बेड | ऑफिस खुर्ची | ऑफिस टेबल

शॉप नं.६ स्मिता अपार्टमेंट, सावेडी रोड, अ.नगर. 9822506521, 9850890005



सुवर्णसंधी..!

**भाड्याने देणे**

९०० स्क्वे.फूट असलेली दोन मजली नवीन कन्स्ट्रक्शन २४ तास पिण्याचे पाण्याची टाकी, अटॅच बोरवेल, अटॅच टॉयलेट असलेली बिल्डिंग मेडिकल, होलसेल, पतसंस्था, ऑफिसेस, रिटेलसाठी भाड्याने देणे

अमृत डिस्ट्रिब्युटरशेजारी नवीन देशपांडे हॉस्पिटलसमोर, लक्ष्मीबाई कारंजा, अ.नगर

8329520865



**दुकान भाड्याने देणे**

प्रोफेसर कॉलनी चौक, अहिल्यानगर

9422229660



टि.व्हि. सेंटर चौकात, सावेडी येथे रोडटच 250 स्के.फु. गाळा भाड्याने देणे

7057953250



**2BHK फ्लॅट विकणे आहे**

तिसरा मजला/लिफ्ट नाही नगर-मनमाड रोड, हुंडेकरी शोरुम समोर, अनुष्का रेस्टॉरंटच्या मागे, पारस-आनंद अपार्टमेंट, अहिल्यानगर

8379986313



**भाड्याने देणे**

बागडपट्टी येथील सम्राट इलेक्ट्रीक समोरील ८०० स्क्वे.फुट बेसमेंट भाड्याने देणे आहे

9822118886



**प्लॉट विकणे**

गावडे मळा, शिवचिदंबर मंदिराशेजारी, एकविरा चौक, पाईपलाईन रोड येथे १४२० (स्क्वे.फुट) पुर्वमुखी प्लॉट विकणे आहे

9834637850



पुरुषांसाठी ब्रॅण्डेड प्रिमीयम क्वालिटी

मर्यादित स्टॉक

**जम्बो साईज**

7XL पर्यंत शर्ट

5XL पर्यंत टी-शर्ट

44 साईज पर्यंत जिन्स व फॉर्मल पॅन्ट

*कॉटन पॅन्ट व नाईट पॅन्ट योग्य दरात उपलब्ध

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही शुभ मॉल

मयुरी लेडिज मॉलच्या वर मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८



**पाहिजेत**

सिक्युरिटी गार्ड हाऊस किपींगसाठी पुरुष/महिला पाहिजे

स्टार २४ सिक्युरिटी सर्व्हिसेस्

8788365654

8459986601



**पाहिजेत**

अधिपरिचारिका/ स्टाफ नर्स : जागा २ (ANM/GNM)

लेखी कामासाठी लिपीक/क्लर्क जागा : २ (बारावी पास)

अक्षय गिते हॉस्पिटल बालिकाश्रमरोड, अहिल्यानगर

9422740888

9665557650



**कामासाठी मुले पाहिजेत**

खलील्स गॅरेजमध्ये कामासाठी होतकरू व गरजवंत मुलांची आवश्यकता आहे.

योग्य कामास समाधानकारक मोबदला (पगार) मिळेल.

-: संपर्क :-

9881234780



अभिनव अर्बन मल्टिनिधी नगर शाखेसाठी जागा भरणे आहे

* क्लार्क : ३ (फक्त महिलांकरिता)

पत्ता : जॉगिंग ट्रॅकसमोर, प्रोफेसर कॉलनी चौक, अहिल्यानगर

7218370405

8669503074



**पाहिजेत**

मार्केटिंग (बाहेरगावी जाण्यासाठी)

महिला/निर्व्यसनी पुरुष भरणे आहे

वाहन व चालक व्यवस्था उपलब्ध (आकर्षक पगार)

* ऑफिशियल कामासाठी-

महिला/निर्व्यसनी पुरुष * शिक्षण :- दहावी

दुरेकर सायन्स ॲकॅडमी

* मुलाखत- रविवार दि. ५ ऑक्टोबर २०२५ * सकाळी- ११ ते २

सोनानगर चौक, सावेडी, अ.नगर * मो.:- 9545445050



कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा

एक किलो मागे एक कोलगेट ब्रश फ्री..फ्री..

रत्नकमल चहा

ब्रॅंडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा एक वेळेस जरुर तुलना करुन पहा

आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते

रत्नकमल, दुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१

Contact : 8767369367

इतर कंपन्या पेक्षा 50 ते 70 रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम.



सर्व ग्राहकांना विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा..

नागेश आर.तुमनपेल्ली

२४ व्या वर्षात पदार्पण..

श्री साई ज्वेलर्स

कृष्णा टॉवर, सराफ बाजार, अहमदनगर, महाराष्ट्र - 414001

Whatapp - 7747891011 / Mo. 9405208402

Follow us



संजय ज्वेलर्स

अलंकार असे, म्हणजे संपूर्ण वेशभूषा ठरते पूर्ण !

दसरा ऑफर

२ ऑक्टोबर ते ४ ऑक्टोबर

दागिन्यांवर 8.5% मजुरी

ज्या कॅरेटचे सोने त्याच कॅरेटचा ONLINE सोने भाव

जुने दागिने आणा आणि नवीन दागिने घेऊन जा विनाघट

तळ मजला, शॉप नं ६, सिटी सेंटर विंग ए बिल्डिंग, मिस्किन माळा नगर, सावेडी, अहिल्यानगर 9518720074


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत **जोहेर मजहर हुसेन, रा.गुलमोहोर रोड, सावेडी, अहिल्यानगर** यांच्या मालकीची असून सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे, असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे सावेडी** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे- सर्व्हे नंबर ८७/अ मधील प्लॉट नं. ६अ चे क्षेत्र २७८.८१ चौ.मीटर यापैकी पश्चिमेकडील बाजूचा १३९.४० चौ.मीटर प्लॉट व त्यामधील बांधकामासह मिळकत. **यांसी चतु:सिमा-**

पुर्वेस :- प्लॉट नं. ६ अ पैकी भाग, दक्षिणेस :- प्लॉट नंबर ६ ब

पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. ७

ॲड.तनवीर एम. शेख, नोटरी पब्लिक (भारत सरकार)

ॲड.मोहसीन आय.शेख, कस्तुरी प्लाझा, डावरेगल्ली, अहमदनगर.

मो : ९२७०४६४६००, ८०८७७४२४२८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही मिळकतीचे विद्यमान मालक **१.सौ.नयना योगेश पाटील, २.सौ. अपर्णा भुषण काळे, रा. पिंपळे गुरव, पुणे, ३.सौ. अर्चना सुनिल ढवण, ४.श्रीमती मंदाकिनी आनंदराव ढोरमले, रा. चिंचवड गांव, पुणे** यांच्या वडिलोपार्जित मालकी वहीवाटीची मिळकत असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान सदर मिळकतीचे विक्रीबाबत बोलणी होऊन विद्यमान मालकांनी आमचे अशिलांकडून विसारादाखल रक्कम स्वीकारुन सदर मिळकत आमचे अशिलास खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे व त्याप्रमाणे सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार लवकरच होणार आहे. सदर मिळकतीवर इतर कोणाचाही बोजा नसून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही मालकी हक्क हितसंबध अगर कब्जा नाही, अशी मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलास खात्री दिली असून भरोसा दिलेला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क वहिवाट इत्यादी कोणत्याही प्रकारचा कसलाही मालकी हक्क हितसंबध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व निजोखमीआहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : १. मिळकतीचे वर्णन :-** जि. अहमदनगर पोट तुकडी ता. पारनेर येथील जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे जातेगांव येथील गट नं. १७५ चे क्षेत्र १ हे.१४ आर+पोट खराबा ० हे. ४२ आर असे एकूण क्षेत्र १ हे. ५६ आर यांसी आकार ० रु. ३० पैसे यापैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे पुर्वेकडील ० हे ५७ आर + पोट खराबा ० हे. २१ आर असे एकूण क्षेत्र ० हे. ७८ आर** क्षेत्र यांसी आकार ० रु. १५ पैसे अशी संपूर्ण शेतजमीन मिळकत यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस - लागू गट नं. १७६ दक्षिणेस - लागू गट नं. १६९

पश्चिमेस - गट नं. १७५ पैकी उर्वरीत क्षेत्रउत्तरेस - नगर - पुणे रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक शेतजमीन मिळकत. त्यामधील तदंगभुत वस्तुसह, वागवहिवाटीचे हकांसह काही एक राखुन न ठेविता.

ॲड. फिरोदिया आनंद आर.

ऑफिस-११९, अंबर प्लाझा ए बिल्डींग, एस. टी. स्टॅण्डजवळ, अहमदनगर

मो. ९८९०६१५२५३

अहमदनगर

ता.०१/१०/२०२५


अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान कमजोरी / शुक्राणूंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य

डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)

२७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

ISO मानांकन प्राप्त सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक

विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहमदनगर

संपर्क: 94 22 23 90 13 ▪ www.sextreatment.in



**महासेल...ऑफर**

खास ग्राहकांच्या आग्रहास्तव महिलांसाठी दिवाळी पुर्वीचा शेवटचा महासेल..

शुक्रवार दि. ३ ते रविवार दि. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी फक्त तीनच दिवस ऑफर उपलब्ध

यापैकी काहिही घ्या. फक्त ₹200/-

* फक्त महिलांसाठी :-

टु पिस, थ्रि पिस, वन पिस, नाईट ड्रेस, कॉड सेट, साडी, वर्क केलेले ब्लाऊज, फॉरमल पॅन्ट, ट्राऊजर, अजुनही बरेच काही..

स्ट्रेचेबल ब्लाऊज फक्त रु १००/- ला दोन

सर्वांसाठी स्वेटर्स व जर्किन्स् | मर्यादित स्टॉक

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल

मयुरी लेडिज मॉलच्या वर

मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद मिळकती विद्यमान मालक **श्री. मुश्ताक नवाब शेख, रा. मेघराज कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर** (अहमदनगर) यांचे खरेदी मालकी हक्क वहिवाटीच्या असून सदर मिळकती त्यांच्याच प्रत्यक्ष ताब्यात व कब्जात आहे. त्यांनी आमचे अशिलांना सदर मिळकती खरेदी देण्याचे ठरविलेले आहे. सदरील विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांकडून विसारापोटी रक्कम स्वीकारलेली आहे. तसेच, सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व निजोखमी आहे, अशी खात्री व भरवसा सदरील मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदर मिळकती अथवा सदर मिळकतींच्या कोणत्याही हिस्स्याविरुद्ध अथवा बाबत कोणाचाही खरेदीखत, साठेखत, आदला-बदल, तारण, गहाण, भेट, दान, ट्रस्ट, वारस, वाटणी, कौटुंबिक व्यवस्था, पोटगी, इच्छापत्र, भागीदारी, ताबा, लीज, लायसेन्स, लीन, बोजा, प्लेज, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, कुळ, इझमेंट, वहिवाट इ. अथवा अन्य कोणत्याही प्रकारे कसलाही हक्क, अधिकार, हित-संबध इ. दावा असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत आम्हास दिलेल्या पत्यावर आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह कळवावे. संबंधितांनी तसे न केल्यास त्यांची या संदर्भात कोणतीही हरकत / म्हणणे नसून त्यांनी त्यांचा सदर मिळकतमधील हक, अधिकार, हित-संबध इ. दावा स्वतःहून सोडून दिला असल्याचे समजण्यात येईल आणि आमचे अशिल सदर मिळकतच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

**मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहमदनगर, तालुका व तुकडी अहमदनगर पैकी, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **सावेडी** येथील **सर्व्हे क्र. २८/१अ** मधील **प्लॉट क्र. १५** (संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे क्र. २८/१अ/प्लॉट१५) चे एकूण क्षेत्रफळ २.९८.१० आर (म्हणजेच २९८.१० चौ. मी.), हा संपूर्ण बिगरशेती प्लॉट काही एक राखून न ठेवता. सदर प्लॉट क्र. १५ च्या **चतु:सीमा खालीलप्रमाणे : पूर्व :** ६ मीटर रुंद रस्ता, **दक्षिण :** ६ मीटर रुंद रस्ता, **पश्चिम :** प्लॉट क्र. १४, **उत्तर :** प्लॉट क्र. १६.

श्री. नंदकुमार जालिंदरनाथ चोभे

(बी.कॉम., एल.एल.एम.) ॲडव्होकेट व नोटरी

पत्ता : २ रा मजला, कोर्ट वार्ड बिल्डिंग, तारकपूर एस. टी. स्टँड समोर, अहमदनगर - ४१४००३. फोन : ९६५७७१७९०६, ई-मेल : njchobhe@gmail.com


FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING

100% JOB ASSISTANCE

COURSE DETAILS

COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING

ADVANCE ACCOUNTING | AUDITING

IN JUST 17900/-

Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance

Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 9371051769

Old ST stand Branch: Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001 9371151769

Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 7447761769

An ISO 9001:2015 Certified DiSHA® COMPUTER INSTITUTE


## जाहीर नोटीस

क्र.एन.आर./मकानसं.२७०/भिंगार/ २०२५-२६, दि.१८/०९/२०२५

या नोटिशीद्वारे जाहीर करण्यात येते की, १) लक्ष्मी विजयकुमार कुदे, वय ७६ वर्षे, धंदा-गृहिणी, २) राजश्री सुधीर तोगरे, वय-६५ वर्षे, धंदा-गृहिणी, ३) हेमलता नंदकुमार तोगरे, वय-५४ वर्षे, धंदा-गृहिणी, ४) सरोजिनी मिलिंद निराळी, वय-५० वर्षे, धंदा-गृहिणी यांनी घर नं.२७०, सर्व्हे नं.२११/१४९, भिंगार/ अहिल्यानगर छावणी परिषद हे १) कायदेशीर वारस प्रमाणपत्र क्र.सिव्हिल एम.ए.१४६/२०२४, दि.०३/०१/२०२५, २) कायदेशीर वारस प्रमाणपत्र क्र.सिव्हिल एम.ए.१४५/२०२४, दि.१९/१२/२०२४ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहिल्यानगर यांचेकडे तसे लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. २७०, भिंगार

क्षेत्रफळ : १५२.३३ चौ.फुट

कार्यालय अधिक्षक

कृते मुख्य अधिशासी अधिकारी, अहिल्यानगर छावनी परिषद

(विक्रांत मोरे)

## जाहीर नोटीस

क्र.एन.आर./मकानसं.२७१/भिंगार/ २०२५-२६, दि.१८/०९/२०२५

या नोटिशीद्वारे जाहीर करण्यात येते की, १) लक्ष्मी विजयकुमार कुदे, २) राजश्री सुधीर तोगरे, ३) हेमलता नंदकुमार तोगरे, ४) सरोजिनी मिलिंद निराळी ५) हनुमंत सच्चिदानंद कुदे, ६) पुरुषोत्तम महादेव कुदे, ७)अंबुबाई श्रीपद कुदे, ८) रामचंद्र गणपत कुदे, ९)उषा शाम कुदे, १०) मिलिंद लक्ष्मण कुदे, ११) अशोक गणपत कुदे यांच्या संयुक्त नावासहित यांनी घर नं.२७१, सर्व्हे नं.२११/१२४, भिंगार, अहिल्यानगर छावनी परिषद हे १) कायदेशीर वारस प्रमाणपत्र सिव्हिल एम.ए. क्र.१४६/२०२४, दि.०३/०१/२०२५ २)कायदेशीर वारस प्रमाणपत्र सिव्हिल एम.ए.क्र. १४५/२०२४, दि.१९/१२/२०२४ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहिल्यानगर यांचेकडे तसे लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. २७१, भिंगार

क्षेत्रफळ : ५७.७१ चौ.फुट

कार्यालय अधिक्षक

कृते मुख्य अधिशासी अधिकारी, अहिल्यानगर छावनी परिषद

(विक्रांत मोरे)

## जाहीर नोटीस

क्र.एन.आर./मकानसं.२७२/भिंगार/ २०२५-२६, दि.१८/०९/२०२५

या नोटिशीद्वारे जाहीर करण्यात येते की, लक्ष्मी विजयकुमार कुदे, वय ७६ वर्षे, धंदा-गृहिणी, राहणार- ब्लॉक नं.२१, सावेडी रोड, अहिल्यानगर यांनी घर नं.२७२, सर्व्हे नं.२११/१२३, भिंगार/ अहिल्यानगर छावणी परिषद हे कायदेशीर वारस प्रमाणपत्र क्र.सिव्हिल एम.ए.१४६/२०२४, दि.०३/०१/२०२५ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. २७२, भिंगार

क्षेत्रफळ : ३७.५० चौ.फुट

कार्यालय अधिक्षक

कृते मुख्य अधिशासी अधिकारी, अहिल्यानगर छावनी परिषद

(विक्रांत मोरे)

## जाहीर नोटीस

क्र.एन.आर./मकानसं.२७३/भिंगार/ २०२५-२६, दि.१८/०९/२०२५

या नोटिशीद्वारे जाहीर करण्यात येते की, १) लक्ष्मी विजयकुमार कुदे, वय ७६ वर्षे, धंदा-गृहिणी, २) राजश्री सुधीर तोगरे, वय-६५ वर्षे, धंदा-गृहिणी, ३) हेमलता नंदकुमार तोगरे, वय-५४ वर्षे, धंदा-गृहिणी, ४) सरोजिनी मिलिंद निराळी, वय-५० वर्षे, धंदा-गृहिणी यांनी घर नं.२७३, सर्व्हे नं.२११/१२२, भिंगार/अहिल्यानगर छावणी परिषद हे १) कायदेशीर वारस प्रमाणपत्र एम.ए. क्र.१४६/२०२४, दि.०३/०१/२०२५, २) कायदेशीर वारस प्रमाणपत्र क्र. सिव्हिल एम.ए.क्र.१४५/२०२४, दि.१९/१२/२०२४ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहिल्यानगर यांचेकडे तसे लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. २७३, भिंगार

क्षेत्रफळ : २५४.२६ चौ.फुट

कार्यालय अधिक्षक

कृते मुख्य अधिशासी अधिकारी, अहिल्यानगर छावनी परिषद

(विक्रांत मोरे)


* दिनांक - ०२ ऑक्टोबर ते ०९ ऑक्टोबर २०२५

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

Dashavatar 11:15 AM

Jolly LLB 3 07:30 PM

Vada Paav 05:30 PM

Sunny Sanskari Ki tu 08:00 AM | 10:30 AM, 01:15 PM | 04:00 PM, 06:40 PM | 10:30 PM

Kantara : A Legen 08:00 AM | 09:45 AM, 12:50 PM | 02:15 PM, 04:00 PM | 07:15 PM, 09:30 PM | 10:30 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow | CONNPLEX SMART THEATRE

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar

Mo. 6353564618 / 7790094001



Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater

SHOW TIMING - 25 SEPT TO 02 OCT

जॉली LLB 3: 09:00 AM, 11:00 AM, 04:00 PM, 05:00 PM, 08:10 PM, 10:45 PM

दे कॉल हिम OG: 09:00 AM, 12:00 PM, 05:20 PM, 09:15 PM, 11:00 PM

दशावतार: 02:15 PM, 08:00 PM

बदमाश: 03:00 PM

आतली बातमी फुटली: 12:00 PM

छबी: 01:45 PM, 07:00 PM

टीप: शो च्या वेळा बदलू शकतात

Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow

नगर कॉलेज जवळ, जुडिओच्या वरती, अ.नगर

9881300400, 0241-2346000

Cinélife MINIPLEX

Dasara SPECIAL OFFER
कुबेर मार्केट
GET UP TO 50% OFF डिस्काउंट
तेलीखुंट, एम.जी. रोड, अहिल्यानगर. मो.: 9970577799



विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर २५ व्या वर्षात यशस्वी पदार्पण
विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा!
सोने, स्थावर व एलआयसी तारण कर्ज सुविधा उपलब्ध.
- मोबाईल बॅंकिंग सुविधा उपलब्ध
- संस्थेची एम.आय.डी.सी. व दिल्लीगेट येथे स्वमालकीची सुसज्ज इमारत
- ठेवींवर आकर्षक व्याजदर
- सर्व तारण कर्जे असल्यामुळे ठेवींची १००% सुरक्षितता
- ज्येष्ठ नागरिकांना ठेवीवर जास्त व्याजदर व घरपोहोच सेवा

प्रथितयश उद्योजक संचलित
धनसंपदा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.
: मुख्य कार्यालय :
प्लॉट नं. पी-२३, चाकण ऑईल मीलसमोर, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर. फोन नं. २७७०४९.
: शाखा :
दिल्लीगेट, अहिल्यानगर. फोन नं. २३२७३१९.
Email : dhansampda@gmail.com
Website : https//dhansampadapatsanstha.com

दर्जेदार व माफक दरात फ्लेक्स प्रिंटींग
संपर्क : 9403232323



स्टॉक क्लिअरन्स सेल
होलसेल रेट शिवाय 20% सूट
ही योजना २ ऑक्टोबर २०२५ (दसरा) पासून
श्री ओम टेक्सटाईल्स
होलसेल साडी विक्रेता
पहिला मजला, छाया टॉकीज समोर, चितळे रोड, अहिल्यानगर.

शहराच्या मध्यवस्तीत १६०० स्क्वे.फुट जागा भाडेतत्वावर देणे आहे.
संपर्क - मो. 98230 54075

|| तिसरे पुण्यस्मरण ||



स्व. हरीराम रामचंद माखीजा
स्वर्गवास ता. ०१/१०/२०२२

सब कुछ होने के बावजूद भी कुछ भी नही है,
ऐसा लगता है आपके बिना, यह परिवार खाली है...

आपकी पावन स्मृतिमें भावपुर्ण श्रद्धांजली..

❋ शोकाकूल ❋
समस्त माखीजा परिवार तथा रिश्तेदार


: फर्म :
श्री गणेश एजन्सीज, माळीवाडा बसस्टॅण्ड रोड, अ.नगर, मो. 9028877777
श्री गणेश टेलिकॉम नवीपेठ, लोढा हाईट्स, अ.नगर, मो. 9225577777



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना जयंती निमित्त कोटी कोटी विनम्र अभिवादन!



मा.श्री.अविनाश देडगांवकर
समाजभूषण पुरस्कारप्राप्त समाजसेवक, अहिल्यानगर



Raymond 100 SINCE 1925
HAPPY Dussehra
Specially crafted collection now in stores
THE Raymond SHOP
5% EXTRA CASHBACK SBI card
*Min. Trxn.: ₹7,500; Max. Cashback: ₹750 per credit card account; Validity: 22 Sep - 23 Oct 2025. T&C Apply.
दुकान क्रमांक 1, 2, 3, तळमजला, माऊली संकुल, सावेडी, अहिल्यानगर ☎0241-3353092



# प्रथम पुण्यस्मरण

मन अजुनही मानत नाही, कि तु आमच्यात नाही,
आता सांगावे केस या मनाला... रोखावे कसे आसवांना...
दृष्ट लागली या सुखी संसाराला... प्रेमरुपी रत्ने देऊन गेली आम्हाला...
स्मित हास्यांची ही सोज्वळ मूर्ती... जगी देऊन गेली चिरंतन स्मृती ...

आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली

❋ शोकाकुल ❋

माधव यादव वाळके

| | |
|---|---|
| सौ. सुनीता किशोर | किशोर माधव वाळके |
| सौ. सुचिता संतोष | डॉ संतोष माधव वाळके |
| सौ. संगीता पांडुरंग | पांडुरंग मुरलीधर खपके |
| ॲड. सौ. स्वाती कैलास | कैलास सुर्यभान गडाख |
| सौ. शिल्पा मिलिंद | मिलिंद जनार्दन वाळके |
| सौ. दीपा महेश | डॉ महेश जनार्दन वाळके |

गंभा. सिंधूताई जनार्दन वाळके

कै.सौ. कांता माधव वाळके
स्व.दि.२/१०/२०२४

समस्त वाळके परिवार, अप्तेष्ट व नातेवाईक